
# यशोधन

७६




यशवंतराव चव्हाण
यांचे निवडक विचार

संकलन : विनायक पाटील

923.60954
Pat
016116

Y.C.P. LIBRARY
923.60954/Pat
016116



# यशोधन

## यशवंतराव चव्हाण यांचे निवडक विचार

**संकलन : विनायक पाटील**

Y. B. CHAVAN LIBRARY
- MUMBAI -
CALL NO.: M/923.60954-PAT
ACC. NO.: 16116
DATE: 14/11/05

राजहंस प्रकाशन

# यशोधन

संकलन : विनायक पाटील

Yashodhan
Vinayak. Patil

प्रकाशक : दिलीप माजगावकर
राजहंस प्रकाशन, १०२५, सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०
फोन - (०२०) २४४७३४५९
E-mail : rajhans1@pn2.vsnl.net.in

मुद्रक : रोहन एंटरप्रायझेस
१६/२, 'स्वोजस', सहवास सोसायटी, कर्वेनगर, पुणे ४११ ०५२

अक्षरजुळणी : रेखा ढोले
प्रिंट लिंक, ७६९/५, शिवाजीनगर, पुणे ४११ ००४

मुखपृष्ठ : सतीश देशपांडे

आवृत्ती पहिली : जानेवारी २००५

ISBN 81-7434-307-5

**किंमत : ६० रुपये**

CALL
ACC. NO.:
DATE:

# तो राजहंस एक

'यशोधन'ची पहिली आवृत्ती प्रसिद्ध झाली, तेव्हा देशात आणीबाणी होती.

साप्ताहिक 'माणूस'चे संपादक व राजहंस प्रकाशनचे प्रमुख श्री.ग. माजगांवकर हे माझे मित्र.

'यशोधन'ची जमवाजमव झाल्यानंतर मी श्री.गं.ना म्हणालो की, हे संकलन 'राजहंस'ने प्रकाशित करावे. किंबहुना 'राजहंस' प्रकाशित करील, असे मी गृहितच धरले होते. परंतु श्री.गं.नी 'यशवंतराव चव्हाणांसारख्या सुसंस्कृत राजकारण्याच्या उक्तींचे संकलन, प्रकाशित करण्यास मला आनंदच वाटला असता. शिवाय हे संकलन, तुमच्यासारख्या निकटवर्तीयाने केले आहे; परंतु देशात आणीबाणी जाहीर झालेली आहे व आणीबाणीचा निर्णय घेण्याच्या प्रक्रियेतील यशवंतराव चव्हाण हे एक आहेत. म्हणून हे संकलन मी माझ्या प्रकाशन संस्थेतर्फे प्रकाशित करणे, मला योग्य वाटत नाही' अशी असमर्थता प्रकट केली. आणि तसेच झाले. 'यशोधन', 'राजहंस'तर्फे प्रकाशित झाले नाही.

चिंतामणी लाटकरांच्या 'कल्पना मुद्रणालया'कडे 'यशोधन' छपाईला पाठविण्याचा निर्णय माजगावकरांनी घेतला व माझ्या सोबत येऊन पुस्तक छपाईला टाकले. सुभाष अवचटांना भेटून मुखपृष्ठाचीही रचना त्यांनीच करून घेतली. 'कल्पना मुद्रणालया'त बसून स्वत: माजगांवकरांनी मुद्रितेही तपासली. स्वत:च्या कार्यालयात जाण्यापूर्वी ते लाटकरांना भेटून कामाचा आढावाही घेत असत. पहिली आवृत्ती प्रसिद्ध झाली १९७७ साली. राजकीय निष्ठा व

वैयक्तिक मैत्री या भिन्न बाबी आहेत व त्या दोन्ही आपण एकाच वेळी सांभाळू शकतो, याचा आदर्श वस्तुपाठ माजगांवकरांनी माझ्यापुढे ठेवला होता. या घटनेचा माझ्या मनावर योग्य तो परिणाम झाला व आयुष्यभर माझ्यासाठी ते एक मार्गदर्शक तत्त्व ठरले.

या घटनेला २७ वर्षांचा काळ लोटला. 'राजहंस प्रकाशन'चे प्रमुख व श्री. गं. चे धाकटे बंधू दिलीपराव यांचा फोन आला. नाशिक येथे ७८ वे साहित्य संमेलन होत आहे. तुम्ही संमेलनाचे कार्यकारी अध्यक्षही आहात. 'यशोधन'ची पुढील आवृत्ती काढायला हवी. मी तात्काळ होकार दिला!


अशी ही सहावी आवृत्ती.

आज श्री. ग. आपल्यात नाहीत.

आहेत त्यांच्या आठवणी व दिलीप माजगावकरांनी जपलेली कौटुंबिक मैत्रीची भावना.

ती अशीच टिकून राहो. वाढो.

**विनायक पाटील**



# 'यशोधन' सुपूर्त करताना

साहेबांची भाषणे, ते मुख्यमंत्री असल्यापासून मी ऐकत आलो आहे. पाच-पन्नास मैलांच्या परिसरात कोठेही भाषण असले, तरी मी हजर राहत आलो आहे. चांगले शब्द कानांवरून जात. चांगले शब्द मला नेहमीच आकर्षित करत आले आहेत. साहेब हे शब्दांचे जादूगार! त्यांनी केलेली भाषणे लक्षात राहत व प्रयत्नपूर्वक मी ती ठेवीतही असे. ज्या ज्या वेळी मित्रमंडळी जमत, त्या त्या वेळी त्यांच्या हावभावांची व उच्चारांची नक्कल करून मी दाखवी, त्याची पावती मित्रांकडून मिळत गेली. पुढे पुढे सार्वजनिक क्षेत्रातील कार्यकर्ते 'साहेबांची नक्कल करून दाखव' म्हणून कोठेही आग्रह करू लागले. नक्कल हुबेहूब होते असे ते म्हणत व मी सुखावत असे. त्याच त्या वाक्यांची पुनरुक्ती होऊ नये म्हणून नवीन वाक्यांच्या शोधात त्यांची भाषणे आवाजांच्या चढ-उतारांसह व लकबींसह मी तल्लीनतेने ऐकू लागलो. नंतर नक्कल हमखास. कार्यकर्ते-मित्र खूष व मलाही प्रसिद्धी. संयुक्त महाराष्ट्र स्थापनेच्या नंतरच्या काळात त्यांच्या भाषणाला प्रचंड गर्दी जमत असे. आजतागायत त्यात खंड नाही. या माणसाने बोलावे आणि लोकांनी ते आवडीने ऐकावे. त्या प्रचंड गर्दीतील एक श्रोता ही माझी भूमिका. सभेत बसण्यासाठी कुठे जागा मिळेल व भोवताली गर्दी कुठल्या थरातील असेल हे आपल्या हातात नसते. कधी विद्यार्थ्यांच्या कंपूमध्ये, कधी शेतकऱ्यांच्या घोळक्यात, कधी पांढरपेशांच्या शेजारी तर कधी कामगारांमध्ये मी बसलेलो आहे. मुख्य वक्त्यांचे भाषण सुरू होईपर्यंत आणि नंतर इतर वक्ते व आभारप्रदर्शनापर्यंत

गर्दीलाही कंठ फुटतो. ती बोलू लागते. आपल्या शेजारी कोण आहे, याची पर्वा न करता माणसे भाषणासंबंधी शेरे मारत असतात. अगदी मुक्तपणे. त्यांच्या पक्षातील भक्तगणांपासून ते प्रखर विरोधी पक्षकार्यकर्त्यांपर्यंत. वसंत व्याख्यानमालेला वर्षानुवर्षे जाणाऱ्या, कान तयार असलेल्या श्रोत्यांपासून ते साहेबांना फक्त पाहण्यासाठी आलेल्यांपर्यंत सगळ्यांनाच या माणसाच्या भाषणाने आकर्षित केले आहे, हे निश्चित. केवळ ऐकण्यासाठी लोक तासन्‌तास थांबत. एकदा नाशिकला त्यांची सभा संध्याकाळी सात वाजता जाहीर केली होती. निवडणुकीच्या धामधुमीच्या काळात ते इतर जिल्ह्यांतील दौरा आटोपून येणार होते, दहा-वीस सभा उरकून! मैदान श्रोत्यांनी तुडुंब भरले. साहेब आत्ता येतील, थोड्या वेळाने येतील असे होत होत रात्रीचे बारा वाजले. पन्नास हजारांचा जनसमुदाय बसून होता, फक्त ऐकण्यासाठी. कारण, सर्व काही पक्षकार्यकर्ते किंवा पक्षाची बांधीलकी असलेले श्रोते नव्हते. नाशिकसारख्या जागृत शहरातील सर्व थरांतील, लोक होते. बारा वाजून पाच मिनिटांनी साहेब आले. सर्वत्र शांतता पसरली. मंचावर आल्यावर त्यांनी भाषणाला सुरुवात केली. संध्याकाळी सातच्या सभेला रात्री बारानंतर सुरुवात! नाही म्हटले तरी लोक अस्वस्थ झालेच होते. आता दिलगिरी व्यक्त करण्याची नेहमीच्या खाक्यात सुरुवात होईल अशी सर्वांची अपेक्षा. साहेबांनी सुरुवात केली, "तिळगूळ घ्या आणि गोड बोला." कडाडून टाळी पडली. दुसऱ्या दिवशी संक्रांत होती. मध्यरात्रीनंतर तारीख बदललेली होती. एवढ्या औचित्यपूर्ण माफीनंतर पहिल्या वाक्यातच त्यांनी श्रोत्यांना आपल्या ताब्यात घेतले. नंतर तासभर ते बोलत होते. सुरुवातीच्या चार-पाच वाक्यांतच श्रोत्यांना ताब्यात घेणारा हा जबरदस्त वक्ता होता. करंजवण धरणाच्या पायाभरणीचा समारंभ मला आठवतो. पायाभरणीनंतर भाषण होते त्याच जागेवर धरणग्रस्तांपुढे, आपले सर्वस्व पाण्यात बुडवून उठणाऱ्या ग्रामस्थांपुढे! प्रसंग बाका होता.

धरणग्रस्त प्रचंड संख्येने जमले होते. निषेधाच्या घोषणांपासून ते दंगलीपर्यंत काहीही घडणे शक्य होते. साहेबांनी सुरुवात केली. "पिढ्यान्‌पिढ्या आपण राहत असलेली गावं सोडून जात असताना, आपली कुलदैवतं, वास्तू, आपण लावलेली झाडं, त्याभोवतालच्या वातावरणात रमलेलं आपलं मन काय म्हणत असेल? याचा विचार केला की, मन कष्टी होतं. आपल्याला नवीन जागा मिळतील, जमिनी मिळतील, घरांची भरपाई मिळेल परंतु पिढ्यान्‌पिढ्यांच्या सहवासानंतर होणारा दुरावा मोठा बेचैन करणारा असतो..." वातावरण भावविवश झाले. म्हाताऱ्या-कोताऱ्या शेतकऱ्यांनी उपरण्यांनी डोळे पुसले. साहेब बोलत होते. स्वत:चाच गाव सोडून आपल्यालाच दुसरीकडे जाण्याची वेळ यावी, या संवेदनेतून बोलत होते. त्यात ते धरणग्रस्तांच्या दु:खात सहभागी होत होतेच, पण नकळत त्यांना आश्वासनही देत होते की, तुला आम्ही नवीन घर देणार आहोत, नवीन शेतजमीन देणार आहोत, तुझे पुनर्वसन करणे ही आमची जबाबदारी आहे व ती पुरी होईलच! कुणी राज्यकर्ता आपल्यावर आश्वासनांची खैरात करतो असे न वाटता हा माझाच कुणीतरी सांत्वन करतोय असे शेतकऱ्यांना वाटत होते. सभेत गोंधळ करण्याच्या तयारीने आलेले लोक, या माणसाच्या राज्यात आपले वाईट होणार नाही, या आत्मविश्वासाने परत गेले.

प्रसंगानुरूप व औचित्यपूर्ण हे त्यांच्या भाषणातील वैशिष्ट्य मला नेहमीच जाणवले आहे. त्यांची पाच मिनिटांत संपणाऱ्या भाषणांपासून ते तासभरापर्यंतची भाषणे मी ऐकली आहेत. विषय थोडक्यात आटोपणारा असेल, तर केवळ आपण जास्त बोलले पाहिजे या आग्रहाखातर विषयांतर कधीच होत नाही. राजकीय क्षेत्रात एकदा सभाधीटपणा आला व शब्दांची जुळवाजुळव जमली की, माणसांना बोलण्याचा मोह ओवरत नाही. विषयांतर ओघाने आलेच! अशा अनेक पुढाऱ्यांच्या भाषणाचा बळी होण्याचा प्रसंग येतोच. अनेक माणसे चांगले बोलतात. त्यांना आवाजाची साथ

नसते. आवाजात चढउतार नसतात. योग्य हातवाऱ्यांची मदत मिळतेच असे नाही. साहेबांचा आवाज (Appealing) आर्जवी आहे. सातारच्या मातीतून आलेले काही आघात (Accents) सोडले तर पुणेरी उच्चारात साहेब बोलतात. हो; बोलतात हेच खरे! कारण त्यांचे भाषण, भाषणापेक्षा हितगुजासारखेच वाटते. त्यांच्या गेल्या अनेक वर्षांच्या व्याख्यानांचा परिणाम म्हणून त्यांच्यासारखे बोलण्याचा अनेक कार्यकर्ते प्रयत्न करू लागले. नेहमी ऐकणाऱ्यांच्या हे लक्षात येत असे. अशाच एका वक्त्याच्या भाषणानंतर "काय? कसं झालं भाषण?" या खाजगीतल्या प्रश्नाला, "गायकीत घराणी असतात तशी भाषणात असती, तर आपण चव्हाण घराण्यात बोललात." या उत्तराने मी त्यांचा राग ओढवून घेतला होता. त्यांच्या शैलीचा स्वत:चे घराणे निर्माण करण्याइतका महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांवर परिणाम झाला आहे. भाषणे ऐकत असतानाच त्यांच्या भाषणांची संकलने पुस्तकरूपाने उपलब्ध होऊ लागली होती. त्याची मी पारायणे केली. माझ्या लक्षात आले की, ही भाषणे नुसतीच उत्कृष्ट शब्दांची जुळवाजुळव नसून त्यामागे एक निश्चित तत्त्वज्ञान आहे, कार्याच्या दिशा आहेत. अर्थकारण, राजकारण, संरक्षण, शेती, कार्यकर्ता, पक्षकार्य व इतर क्षेत्रांत त्यांचे स्वत:चे असे विचार आहेत व ते सदैव मार्गदर्शन करणारे आहेत. ही एक स्वतंत्र नीतिसूत्रे आहेत याची खात्री झाली. हे विचारधन काळावर मात करून कार्यकर्त्यांना सदैव मार्गदर्शक राहील असेही जाणवले.

मनात अनेक वेळा येत असे, या शब्दसम्राटाबरोबर आपली व्यक्तिगत ओळख झाली, तर काय मजा येईल. हा शब्दांचा जादूगार खाजगी मैफलीत कसा बोलत असेल, असे औत्सुक्य व त्या मैफलीत आपल्याला प्रवेश मिळावा अशी इच्छा मी अनेक वर्षे बाळगून होतो. हळूहळू जाणे वाढू लागले. बरोबर लोक असत. ठरावीक साच्यातील बोलणे होई. भेटायला येणारे इतर लोक येत व इच्छा तशीच राहून जाई. एक दिवस दिल्लीतील

कामे आटोपून परत फिरण्यापूर्वी त्यांच्या घरी गेलो. वेळ सकाळची होती. भेटणारे तुरळक होते. दोन मिनिटे भेटण्यासाठी वेळ मिळाला. मी बैठकीच्या खोलीत प्रवेश करून उभा राहिलो. बोलण्याची संधी होती, पण बोलणार काय? "बसा विनायकराव!" या त्यांच्या वाक्यामुळे बसलो. वाटले, आता जिल्ह्यात कोणाचे काय चालले याची विचारपूस होईल. मग पाच मिनिटांत आपली रवानगी. आता काय प्रश्न येतो याची मी वाट पाहात बसलो, "हं, काय? त्या अमूकअमूक माणसाची तुम्ही चांगली नक्कल करता असं मी ऐकलंय." या प्रश्नाने मला दरदरून घाम फुटला; कारण मी नुकतेच महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळातील एका मंत्र्याच्या भाषणातील चुका व त्यात माझी भर टाकून नक्कल करून मित्रांकडून टाळ्या मिळविल्या होत्या. माझे हे खाजगी प्रयोग स्थळकाळाचे बंधन झुगारून मुक्तपणे चालले होते. मी 'त्या' मंत्र्यांच्या भाषणातील चुकांची नक्कल करतो, हे त्यांना श्री. शरद पवार यांनी सांगितले असावे, हे मला समजायला वेळ लागला नाही. कारण सगळ्यात जास्त प्रयोग पवारांच्याच पुढे झाले होते. "आता जरा जपून बोलत चला" असा सल्ला मिळतो की काय याची वाट पाहत मी बसलो. "बघू या तुमचा प्रयोग" असे त्यांनी म्हटल्यावर मी घाम पुसला. सगळा उत्साह परत आणण्याचा प्रयत्न केला. उभा राहिलो. पहिल्या दोन-तीन वाक्यांतच साहेब खळाळून हसले. टोपी बाजूला काढून लक्षपूर्वक ऐकू लागले, मुक्तपणाने हसू लागले. अगदी डोळ्यांत पाणी येईपर्यंत! वीस-पंचवीस मिनिटे कशी गेली कळलेच नाही. कॉफी घेऊन बाहेर पडलो. त्यांच्या कार्यालयातील लोक, हल्ली काय वाट्टेल ती माणसे येऊन साहेबांचा अर्धा अर्धा तास घेतात, असा चेहरा करून उभी होती. मला त्याची पर्वा नव्हती. मी फड जिंकणाऱ्या मल्लाच्या थाटात होतो. पहिल्याच खाजगी बैठकीत औपचारिकपणाची बंधने गळून पडली होती. पहिल्याच 'सा'ला नवीन गायकाला जाणकारांकडून उत्स्फूर्त

दाद मिळाल्यावर जशी होईल, तशी माझी अवस्था झाली होती. शिवाय "दिल्लीत आलास, की भेटत जा" हे आमंत्रण होतेच. तेवढे मला पुरे होते. मी संधी मिळेल तेव्हा भेटत होतो. तेही मनमोकळेपणाने बोलत होते. शेरोशायरी, गझलांची देवाण-घेवाण होत होती. त्यांच्या शालेय जीवनातील कविता, प्रवासातील अनुभव, व्यक्तिचित्रे व किस्से ऐकायला मिळू लागले. या माणसाला विलक्षण स्मरणशक्ती, शब्दांचे वेड व संभाषणचातुर्य आहे, असे प्रत्येक भेटीत जाणवत असे.

एक प्रसंग मला आठवतो. ते मुंबईला आहेत असे समजल्याने मी भेटीसाठी गेलो. ते बाहेर पडण्याच्या तयारीत होते. मी नमस्कार करून बाजूला उभा राहिलो. त्यांनी "चला" म्हटल्यावर गाडीत बसलो. नंतर समजले की, पुणे जिल्ह्यात तळेगाव येथे कार्यक्रम आहे. मी मनात म्हणालो, "चला, तीन तास हक्काचे मिळाले." प्रवासात मी त्यांना व्हिएतनाम युद्धावर लिहिल्या गेलेल्या दोन हिंदी कविता म्हणून दाखविल्या व अमीर खुश्रू यांचे काही शेर सांगितले. प्रवासात इतरही गप्पा झाल्या. तळेगावला पोचल्यावर सभा सुरू झाली. भाषणातील एक संदर्भ देताना त्यांनी प्रवासात ऐकलेल्या अमीर खुश्रूच्या काव्यपंक्ती :

'एक कडी तो जंजीर नहीं
एक नुक्ता तो तसवीर नहीं
तकदीर कौमोंकी होती है
एक शख्स की तकदीर, तो तकदीर नहीं'

या जशाच्या तशा म्हणून दाखविल्या. एकदा सहज ऐकल्यानंतर या काव्यपंक्ती लक्षात ठेवणाऱ्या त्यांच्या स्मरणशक्तीला मी मनातल्या मनात सलाम केला.

त्यांच्या संभाषणचातुर्याचा एक प्रसंग आठवतो. गोहत्ती येथील काँग्रेस अधिवेशनात त्यांनी काही लोकांना रात्री त्यांच्या बंगल्यावर जेवायला बोलावले होते. मी जेवायला गेलो. सोबत श्री. वसंतराव

नाईक, काश्मीरचे त्या वेळचे मंत्री ठाकूर रणधीरसिंग व कलकत्त्याचे एक व्यापारी होते. ते व्यापारी शाकाहारी आहेत हे जेवायला बसल्यावर समजले. साहजिकच ऐनवेळी थोडी धावपळ झाली. जेवणाचे टेबल लावले गेले. ते व्यापारी म्हणाले, "जगातील सर्व शक्तिमान प्राणी शाकाहारी आहेत." साहेबांनी पुष्टी जोडली, "होय, जगातील सर्व उपयुक्त प्राणी शाकाहारी आहेत." टेबलावर हशा पिकला. व्यापारी पुन: म्हणाले, "हे सर्व प्राणी शक्तिमान आहेत, कारण ते शाकाहारी आहेत." साहेब म्हणाले, "आणि म्हणूनच त्यांच्यावर स्वार होणे सोपे आहे." बोलण्याच्या ओघात कोठेही त्या शाकाहारी माणसाचा अहंकार न दुखवता साहेबांनी आपला मुद्दा सोडला नाही. क्षणाचाही विलंब न लावता ते समर्पक उत्तरे देत होते. बोलताना व ऐकताना त्यांचा चेहरा अतिशय बोलका असे. आपण उच्चारलेल्या प्रत्येक वाक्यागणिक त्यांच्या चेहऱ्यावर प्रतिक्रिया व्यक्त होत असत. सहमत असल्याच्या, नसल्याच्या, रागाच्या, आनंदाच्या, मिश्किलपणाच्या! आपल्याला बोलण्यासाठी योग्य वेळ दिल्यानंतर जर आपण पाल्हाळ लावला तर ते नुसतेच "हाँऽऽ ठीक आऽऽ हे" असे म्हणत. त्या वेळी त्यांच्या चेहऱ्यावरचे भाव व त्यांच्या वाक्य उच्चारण्याच्या पद्धतीवरूनच, आपल्याला न सांगता "बाबारे, तुझं काम झालं आहे, तू जा" असे कळे. आपण 'येतो' म्हणाल्यानंतर ते दारापर्यंत पोचवायला येत. पद्धत म्हणून! कितीही छोटा कार्यकर्ता असला तरी!! असाच एक भारावलेला कार्यकर्ता, साहेब आपल्याला दारापर्यंत पोचवायला आल्याचे मला सांगत होता. मी त्याला म्हणालो, "अरे साहेब हुशार आहेत. आपण खरेच जातो किंवा नाही, हे पाहायला ते दारापर्यंत येतात." माझ्या उत्तराचा त्याने एवढा धसका घेतला की, तो हल्ली माझ्याजवळ 'दिल्लीला गेलो होतो' हे सुद्धा सांगत नाही.

भेटीला येणाऱ्या प्रत्येक माणसाचे स्वागत व त्याला प्रेमाने

वाटे लावणे वाटते तेवढे सोपे नाही. शिवाय दिवसागणिक हजारो भेटणारे, विविध क्षेत्रांतले, विविध कामे घेऊन आलेले! सकाळी प्रथम भेट घेणाऱ्याचे स्वागत व सर्व दिवसभराच्या व्यापानंतर रात्री भेटायला आलेल्याच्या स्वागतात फरक नसे. तोच उत्साह, तीच आपुलकी. प्रश्न समजावून घेण्याची तीच पद्धत. सतत चाळीस वर्षांहून अधिक काळ हाच दिनक्रम! कठीण आहे!! साहेबांनाच ते शक्य होते, कारण त्यांच्या कृतीत कृत्रिमता नव्हती. सर्व सहजसुंदर होते. त्यांना माणसे मनापासून आवडत व करीत असलेल्या कामावर त्यांची श्रद्धा होती. कामाची खोटी कळकळ व माणसाविषयी खोटी आपुलकी जास्त काळ टिकत नाही. स्वत:च्या चेंबरबाहेर दहा-वीस भेट घेणारे जमले तरी राष्ट्राची जबाबदारी आपल्यावर कोसळली आहे, असा चेहरा करून बसलेल्या व तुसडी वागणूक देणाऱ्या सत्ताधाऱ्यांशी तुलना केल्यावर, हा माणूस फार मोठा वाटे व तसा तो होताही!

साहेबांच्या प्रचंड सभेतील एक श्रोता, ते त्यांच्याशी मनमोकळ्या गप्पा मारणारा एक निकटवर्ती, एवढा माझा प्रवास झाला होता. त्यांच्याविषयी काही लिहावेसे वाटत होते; पण सुचत नव्हते. एकदा Winds of Change हे त्यांच्या इंग्रजी संभाषणाचे संकलन आणले व 'परिवर्तनाचे वारे' या शीर्षकाने त्याचे मराठी भाषांतर करण्याचे ठरविले. सुरुवातही केली. दरम्यान एक मित्र भेटले. त्यांनी सुचविले, भाषणांचे संग्रह बरेच आहेत. त्यांच्या सर्व उपलब्ध भाषणातील उक्तींचे संकलन तुम्ही का नाही करत? कल्पना रास्त वाटली व अमलात आणली.

मुंबई!...

काँग्रेसच्या लोकसभेतील दारुण पराभवानंतर महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीने घेतलेले शिबिर. शिबिरास झाडून सर्व नेते व कार्यकर्ते हजर होते. एवढ्या देशव्यापी पराभवाची सवय नव्हती.

मनाने व शरीराने खचलेल्या एखाद्या पलटणीचा तळ पडावा अशी स्थिती होती. सर्व वक्ते आपापल्या परीने पराभवमीमांसा व यशस्वी होण्याचे उपाय सांगत होते. सर्वांचे लक्ष होते साहेब काय सांगणार याकडे. कारण पक्षाला त्यांनी अनेक संकटांतून यशस्वी मार्ग दाखविला होता. नुसताच मार्ग दाखविला नव्हता, तर स्वत: आघाडीला राहून त्या मोहिमांचे नेतृत्त्वही केले होते.

मूलभूत विचारांचा भक्कम पाया व त्याची व्यवहारी अंमलबजावणी, यातून निश्चित यश आणणारे यशवंतराव महाराष्ट्राला माहीत आहेत. या शिबिरातील त्यांचा आवेश, 'अंतिम विजय आपलाच आहे' असे सर्व आघाड्यांवर पराभव होत असताना सांगणाऱ्या चर्चिलसारखा वाटला. ते शेवटी म्हणाले, "ज्यावेळी आपण संभ्रमात असतो, त्या वेळी हुकमाचा पत्ता खेळावा." (Whenever in doubt play trump) त्यांची ही उक्ती आजच्या प्रसंगाला उचित वाटते. कार्यकर्ते संभ्रमात आहेत. लोककल्याणाच्या व राष्ट्रउभारणीच्या मूलभूत तत्त्वांचा 'यशोधन' हा हुकमी पत्ता कार्यकर्त्यांच्या हाती देताना, मला विशेष आनंद होत आहे.

**–विनायक पाटील**

# राजकारण



तख्त कोणा एका व्यक्तीचे नाही, कोणा एका धर्माचे नाही, कोणा एका वर्गाचे नाही. ते या देशातल्या चाळीस-पंचेचाळीस कोटी लोकांचे आहे आणि त्याचे रक्षण करणे, हे तुमचे-आमचे कर्तव्य आहे. तुमचे-आमचे हे तख्त, जोपर्यंत चंद्र-सूर्य उगवत राहतील तोपर्यंत कायम राहिले पाहिजे, कारण ते आमच्या स्वातंत्र्याचे व लोकशाहीचे प्रतीक आहे. अशा तऱ्हेची देशभक्तीची भावना आपल्या मनात फुलली पाहिजे.

❑

लोकशाही यंत्रणा तयार करणाऱ्या तज्ज्ञ मंडळींनी राजकीय सत्तेवर कायद्याची आणि इतर बंधने घालून ती सत्ता समतोल करून ठेवली आहे; परंतु आर्थिक सत्ता ही राजकीय सत्तेपेक्षाही अधिक शक्तिमान आहे. सत्ता हे शेवटी सर्वांत मोठे सामर्थ्य आहे. मग ती सत्ता राजकीय असो अगर आर्थिक असो; आणि म्हणून सत्तेचे स्थान हे लोकांच्या कल्याणासाठी उभारलेली एक वेदी आहे, एक यंत्रणा आहे. ते एक मोठे जोखमीचे काम आहे, ही जाणीव सतत आपल्या मनात असली पाहिजे. यासाठी एकच मार्ग आहे आणि तो हा की, आपले हे काम लोकशाहीच्या पद्धतीने चालले आहे की नाही, याचे कठोर आत्मनिरीक्षण नित्य झाले पाहिजे.

❑

अत्यंत कष्टाने आपण या देशात जी लोकशाही आणलेली आहे, जे स्वातंत्र्य आणलेले आहे, ती लोकशाही आणि ते स्वातंत्र्य कायम ठेवून या लोकशाहीच्या आणि स्वातंत्र्याच्या मदतीने या देशामध्ये आपणाला समानता निर्माण करावयाची आहे, गोरगरिबांची गरिबी हटवावयाची आहे आणि लहान व मोठा हा भेद मोडून काढावयाचा आहे. हे महत्त्वाचे काम आम्हांला करावयाचे आहे. पण हे काम आपले आपणच करावयाचे आहे. जे मोठे आहेत ते हे काम करणार नाहीत. लहानांनीच तें केले पाहिजे. पण लहानांच्या मनात जिद्द नसेल, त्यांच्या मनात जागृती नसेल, त्यांच्या मनात गरिबीसंबंधीचा तिरस्कार, संताप नसेल तर लहान, कामाला लागणार नाहीत. लहान, लहान राहिला त्याचे कारण त्याने लहान राहावयाचे ठरविले हे आहे. त्याने आता असा निर्णय घेतला पाहिजे की, मी गरीब राहणार नाही, मी उपाशी राहणार नाही, मी कोणाचा लाचार राहणार नाही. मी या देशाचा मालक आहे. मी स्वतंत्र देशाचा मालक आहे, मी लोकशाहीचा मालक आहे. मला या देशामध्ये लोकशाही टिकविली पाहिजे, स्वातंत्र्याची शक्ती मोठी केली पाहिजे. माझे स्वत:चें जे व्यक्तिमत्त्व आहे, माझे स्वत:चे जे सामर्थ्य आहे, ते मी देशाच्या कामाला लावले पाहिजे. त्यासाठी मला जो जो मार्ग मोकळा दिसेल, तो तो मार्ग मी अंगीकारला पाहिजे. या जिद्दीने तो जर उभा राहिला, तर परक्या देशांतील लोकांना या देशाकडे वाकड्या नजरेने पाहण्याची छाती होणार नाहीच, परंतु या देशामध्ये जास्त लोकांना गरीब ठेवून जे थोडे लोक श्रीमंत राहण्याचा पराक्रम करीत असतील त्यांनाही पराभव स्वीकारावा लागेल. हे मोठे काम आहे, ते तुम्हां-आम्हांला करावयाचे आहे.

❑

प्रगत लोकशाहीचा घटक आहे माणूस. प्रत्येक स्त्री व पुरुष. मग तो शहरात राहणारा असो, अथवा खेड्यात राहणारा असो, विद्यापीठाचा पदवीधर असो अगर नसो, त्याचे सामर्थ्य, म्हणजे त्याच्या मनाचे सामर्थ्य, त्याच्या विचाराचे सामर्थ्य, त्याच्या अनुभवाचे सामर्थ्य आणि त्याच्या शीलाचे सामर्थ्य, हे जेणेकरून वाढीस लागेल, अशा प्रकारची परिस्थिती निर्माण करून, आपणास आपली लोकशाही दृढमूल करावयाची आहे. ही आपली आजची मौलिक गरज आहे. हे सामर्थ्य देण्याची शक्ती शिक्षणात असते, म्हणून तर आपण शिक्षणाच्या पाठी आहोत.

❑

लोकशाही भारताला नवीन नाही. एकाच सत्याचे विविध मार्गाने दर्शन घेण्याची शिकवण असलेले तत्त्वज्ञान व ग्रामपंचायत संस्था, यामुळे लोकशाहीची पार्श्वभूमी या देशात स्वातंत्र्यापूर्वीच तयार होती. क्रांतीप्रमाणेच लोकशाहीसुद्धा एका देशातून दुसऱ्या देशात आयात करण्याची वस्तू नव्हे. त्या त्या देशातील परिस्थितीप्रमाणे लोकशाही आकार घेईल. भारतात दारिद्र्य-निर्मूलन, समान वाटप, सामाजिक न्याय ही जर लोकशाहीची आधारतत्त्वे नसतील, तर ती लोकशाही इथे टिकणार नाही. म्हणूनच आर्थिक लोकशाही ही राजकीय लोकशाहीचा आधार असली पाहिजे.

❑

व्यक्तिपूजा व एकाच माणसाचे नेतृत्व या गोष्टी मला मान्य नाहीत. महाराष्ट्राने गतकाळात या गोष्टी स्वीकारल्या नाहीत व भावी काळातही त्या स्वीकारल्या जातील, असे मला वाटत नाही. त्याऐवजी निश्चित अशा कार्यक्रमावर आधारलेले सामुदायिक नेतृत्त्व मला जास्त पसंत आहे.

❑

मतभेद केवळ मतभेदांसाठीच असू नयेत. तसे ते असले, तर त्यांना वैयक्तिक वा पक्षीय हेव्यादाव्याचे स्वरूप येते आणि त्याने कार्यहानी होते. विकासकार्याच्या द्वारे लोककल्याण साधावयाचे या ध्येयासंबंधी अर्थातच मतभेद असण्याचे कारण नाही. मार्गासंबंधी मतभेद असू शकतील हे मी मान्य करतो; पण असे मतभेद लोकशाहीच्या मार्गानेच सोडविले पाहिजेत.

❑

हारतुरे मिळाले व मोर्चेही निघाले. या गोष्टी लोकशाहीच्या द्योतक आहेत. विरोधाने सुरुवात होते आणि मित्रत्त्वाने नंतर आपण जवळ येतो. मतपरिवर्तन करण्यासाठी लोकशाहीचे सभागृह आहे. लोकशाही ही विरोध वाढविण्यासाठी नसते. विरोध कमी करण्यासाठी असते, विचारांच्या देवाण-घेवाणीचे हे साधन असते.

❑

कोणाही कार्यकर्त्याने आंधळे असू नये. आंधळा दुनियेत हिंडू शकेल, पण आंधळ्याच्या मागे दुनिया जाऊ शकणार नाही.

❑

राज्ये जी चालतात, ती राज्ये चालविणाऱ्या माणसांपेक्षा राज्यशक्तीच्या बाहेर जी माणसे असतात, त्यांच्या पुण्याईने चालतात. ती माणसे ज्या परंपरा आणि ज्या शक्ती निर्माण करतात, त्यांच्या साहाय्याने चालतात.

❑

जनतेच्या काही अपेक्षा असतात, काळाच्या काही प्रेरणां असतात, इतिहासाच्या काही हाका असतात आणि याला उत्तर म्हणून शेवटी राजकीय पक्ष बनत असतो. पक्ष म्हणजे कलाकाराने आपल्या घरात एखादे चित्र रंगवावे आणि लोकांनी ते स्वीकारावे अशातला काही प्रकार नाही. कोट्यवधी लोकांच्या भावनांशी जाऊन मिळणारा आणि त्यांच्या विचारांना साथ देणारा असा जेव्हा पक्ष बनतो, तेव्हा त्याच्या पाठीमागे अनेक गोष्टी उभ्या असतात.

❑

निव्वळ कायद्याची भूमिका ही जुन्या राजवटीला शोभण्यासारखी होती. आपल्या राजवटीला कायद्याने राज्य करावयाचे आहे, पण निव्वळ कायद्याकरिता राज्य करावयाचे नाही. कायद्याचे राज्य हा लोकशाहीच्या कल्पनेतला मुख्य केंद्रबिंदू आहे. कायद्याचे राज्य असलेच पाहिजे. कुणाही व्यक्तीच्या लहरीचे राज्य असता कामा नये, असा त्याचा अर्थ आहे. काही नीती, काही तत्त्वे, काही धोरणे निश्चित करून ती सर्वांना लागू करता यावीत म्हणून कायद्याचे राज्य असले पाहिजे. कायदा मोडला गेला, तर त्याविरुद्ध दाद मागता आली पाहिजे. कायदा मोडणाऱ्याला शासन झाले पाहिजे, मग तो राज्यकर्ता असो वा जनता असो, हा कायद्याच्या राज्याचा अर्थ आहे; पण त्याचा दुरुपयोगही होतो आणि मग राज्य निव्वळ कायद्याकरिताच चालावयास लागते. पण कायद्याचे राज्य हे माणसांकरिता आहे, माणसे महत्त्वाची आहेत, माणसांचे सुख महत्त्वाचे आहे. मानव व त्याचे व्यक्तिमत्त्व हे सर्व शासनयंत्रणेचे केंद्र आहे, याचा राज्य करणाऱ्यांना कधीही विसर पडता कामा नये.

❑

हिंदुस्थान म्हणजे केवळ हिमालय, सह्याद्री किंवा आपणांस माहीत असलेली पाच-पंचवीस खेडी नव्हेत. हिंदुस्थान म्हणजे या देशातील नद्यांच्या काठावर कशीबशी कालक्रमणा करणारे, या देशाच्या माळरानात, डोंगरकपारीत उपेक्षित जीवन जगणारे, या देशाच्या विस्तीर्ण पठारावर, जीवन-संग्रामात हतबल झालेले असे जे लक्षावधी, कोट्यवधी लोक आहेत, ते लोक म्हणजे हिंदुस्थान. या सर्वांच्या मनात ज्या यातना आहेत, दुःखे आहेत, चिंता आहेत, त्या हिंदुस्थानच्या चिंता असल्या पाहिजेत.

❑

स्वतंत्र झाल्याबरोबर आम्ही आमच्या घरचे मालक झालो या भावनेने म्यानातली तलवार बाहेर काढून ती आम्ही आमच्या अंगाभोवती फिरवीत राहिलो असतो, तर आमच्या अवतीभवती आम्ही असंख्य शत्रू निर्माण केले असते. तेव्हा तसे काही न करता मानवजातीच्या कल्याणासाठी आणि आमच्या स्वतःच्याही कल्याणासाठी आम्हांला दुनियेमध्ये शांतता हवी, असे आम्ही जाहीर केले.

❑

जी माणसे देशाच्या स्वातंत्र्याची किंवा देशाच्या जीवनात घडणाऱ्या क्रांतीची आखणी करतात, बांधणी करतात त्यांनाच ती क्रांती पुरी करण्याचा किंवा त्या क्रांतीतून निर्माण झालेल्या शक्तींचा आणि साधनांचा वापर करून, देशाची पुनर्रचना करण्याचा योग लाभतो, पण तोही क्वचितच!

❑

एकपक्ष लोकशाही हे काही आपले ध्येय नाही. देशामध्ये जे विविध पक्ष आहेत, ते चालत राहणार आहेत. संसदीय लोकशाही चालवावयाची असेल, तर याशिवाय मला दुसरा मार्ग दिसत नाही. अर्थात विरोधी पक्ष वाढण्यासाठी मी थोडीच त्यांना मदत करणार आहे? ते त्यांच्या शक्तीने वाढतील. पण ते तसे वाढावेत, असे मात्र मला वाटते.

❑

धर्म हा व्यक्ती आणि परमेश्वर यांच्यामधला संबंध आहे. हिंदू आपल्या मंदिरात परमेश्वराला आळविण्याचा प्रयत्न करतो, तर मुसलमान आपल्या मशिदीत अल्लाशी संभाषण करण्याचा प्रयत्न करतो. ख्रिस्ती आपल्या चर्चमध्ये परमेश्वराला हाक मारतो, तर शीख गुरुद्वारामध्ये परमेश्वराची प्रार्थना करतो; परंतु हे सर्व संपल्यानंतर, मंदिरातून, मशिदीतून, गुरुद्वारातून किंवा चर्चमधून जो माणूस बाहेर पडतो तो हिंदू नाही, मुसलमान नाही, शीख नाही आणि ख्रिस्ती नाही. तो फक्त भारतीय आहे, ही भावना आपल्या मनात रुजली पाहिजे.

❑

लोकशाहीमध्ये आज्ञा नाही. लोकशाहीमध्ये डायलॉग आहे, संभाषण आहे. विचारांची आणि मतांची देवाण-घेवाण आहे हे आपण विसरता कामा नये.

❑

माझा एक आवडता सिद्धांत आहे. लोकशाही सांभाळण्यासाठी दोन मते नसतील, तर मग लोकशाहीचे कारणच राहणार नाही; आणि त्यातला मुद्दा असा आहे की, ती दोन्हीही मते खरी असण्याचा संभव आहे. नुसतीच दोन मते असतात असे नव्हे, तर एखादे वेळी दोन्हीही मते बरोबर असण्याचा संभव असतो. म्हणून तर लोकशाहीची गरज आहे.

❑

देशामध्ये असलेली लोकशाही या देशाला एक मोठा नेता होता म्हणूनच आहे, यावर माझा पूर्वीही विश्वास नव्हता आणि आजही नाही. नेहरूंनंतरही आम्ही या देशात लोकशाही टिकविली. नेहरूंनंतर आलेल्या कर्तृत्ववान पुढाऱ्यांच्या मृत्यूंनंतरही आम्ही या देशात लोकशाही टिकवू शकतो, असा या देशाला पुन्हा एकदा अनुभव आला, बाहेरच्या देशांनाही आला. हिंदुस्थानचा हा एक मोठा विजय आहे, असे आम्ही मानले पाहिजे.

❑

घेतलेले निर्णय बदलू नयेत, असे कोणी सांगितले? शेवटी निर्णय जे घ्यावयाचे असतात ते लोकांच्या हिताकरिता, लोकांच्या इच्छेला मान देऊन घ्यावयाचे असतात. निर्णय महत्त्वाचे की लोक महत्त्वाचे असा प्रश्न निर्माण झाला, तर लोक महत्त्वाचे असेच मी म्हणेन आणि जेव्हा लोक आणि निर्णय यांच्यात संघर्ष निर्माण होतो तेव्हा लोक विजयी होतात, असा इतिहास आहे.

❑

राष्ट्राला राष्ट्र बनविण्याचे काम अजूनही चालू आहे. कुंभाराच्या चाकावर असणारे मडके पक्के नसते. कुंभाराच्या भट्टीत जेव्हा ते भाजून निघते, तेव्हा ते पक्के बनते. अजूनही आमचे कुंभाराचे चाक फिरते आहे, आमच्या देशाच्या एकतेचे चाक फिरते आहे. त्यावरील मडके अद्यापी पक्के बनावयाचे आहे. देशाच्या निरनिराळ्या भागांत आज जे काही घडते आहे, ते याचे द्योतक आहे. निदर्शक आहे.

❑

अगदी साध्या प्रतिकाच्या भाषेत बोलावयाचे झाल्यास मला हिंदुस्थानचे असे चित्र दिसते आहे की, रस्ता डोंगराळ आहे, वेळ उन्हातान्हाची आहे, जवळपास पाणी मिळेलच याची खात्री नाही, साथीला माणसे असतीलच असा भरवसा नाही; परंतु दोन्ही खांद्यांवर हे बोजे घेऊन वाटचाल ही केलीच पाहिजे. हिंदुस्थानची जी सफर चालू आहे, त्या सफरीतला आजचा जो मुक्काम आहे, त्याचे हे चित्र आहे.

❑

महाराष्ट्राच्या राजकारणात जबाबदारीने काम करणारा मी एक कार्यकर्ता आहे. मी हिंदुस्थानच्या राजकारणात गेलो काय किंवा जगाच्या राजकारणात गेलो काय, शेवटी माझे पाय या मातीवर उभे आहेत आणि या मातीतच मला परत यावयाचे आहे, हे मला विसरून चालणार नाही.

❑

राष्ट्रीय ग्रंथालय

विणकर जेव्हा महावस्त्र विणण्यासाठी बसतो, तेव्हा ते महावस्त्र ताबडतोब तयार होत नाही. सुरुवातीला जेव्हा तो आपल्यासमोर गुंतागुंतीचे सगळे लांब धागे टाकून बसतो, तेव्हा आपल्याला सगळा गोंधळ दिसतो. एका धाग्याशी दुसरा धागा समांतर अशा पद्धतीने टाकलेले अनेक धागे आपल्याला दिसतात. त्यावरून त्यातून हा कसले महावस्त्र निर्माण करणार अशी आपल्याला शंका येते; परंतु तो जेव्हा त्या समांतर धाग्यांमधून आडवे धागे टाकत जातो, तेव्हा त्यातून हळूहळू सुंदर महावस्त्र तयार होत चालल्याचा प्रत्यय आपणास येतो. समाजवाद आणण्यासाठी अशाच तऱ्हेचा प्रयत्न हिंदुस्थानमध्ये करावा लागेल आणि तो सर्वांना करावा लागेल. आमची अशी इच्छा आहे की, तो समाजवाद लवकरात लवकर यावा; परंतु त्याची काही विशिष्ट प्रक्रिया आहे आणि त्या प्रक्रियेतूनच आपल्याला जावे लागेल, ही गोष्ट आपण लक्षात ठेवली पाहिजे.

❑

ज्या ज्या वेळी या विचारांच्या आचाराबाबत दुबळेपणा घडेल, मग तो काँग्रेस पक्षाकडून घडो किंवा इतर कोणत्याही राष्ट्रीय पक्षाकडून घडो, त्या त्या वेळी राष्ट्रीय जीवनावर संकट येईल आणि या संकटाबरोबर लोकशाहीसुद्धा संकटात येते की काय असे वाटू लागेल. गेल्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर सगळ्यात मोठा आवाज आपल्याला ऐकावयास सापडतो तो हा की, लोकशाहीवर संकट आले आहे; पण एकतेचा विचार, धर्मनिरपेक्षतेचा विचार, समाजवादाचा विचार आणि लोकशाहीचा विचार हे या देशातील जे पायाभूत विचार आहेत त्यांत गडबड झाली, तरच अशा प्रकारचे संकट येऊ शकेल.

❑

कुठल्याही व्यक्तीच्या विचारांवर किंवा निष्ठेवर आधारलेले काम टिकत नाही. महात्मा गांधींसारख्या माणसाला लोक विसरले. मी उद्या सत्तेतून गेल्यानंतर माणसे मला विसरतील हे मला ठाऊक आहे.

❑

माणसे शेवटी जी मोठी होतात, ती निव्वळ मोठ्यांच्या पोटी जन्माला येतात म्हणून नव्हे. मोठ्यांच्या पोटी जन्माला आल्यामुळे मिळणारे मोठेपण आता जुन्या इतिहासात जमा झाले आहे. आधुनिक काळात समाजामध्ये अनेक प्रश्न, अनेक आव्हाने निर्माण होत असतात. त्यांचा धैर्याने स्वीकार करून त्यामध्ये यशस्वी होण्याचा जी माणसे प्रयत्न करतात, तीच माणसे मोठी होतात.

❑

जनता आणि नेते यांचे असे हे माता आणि पुत्र यांचे नाते आहे. जनता हीच शेवटी माता. तिच्या आशीर्वादातून, तिच्या सर्वस्वातून, तिच्या भावनेतून, तिच्या परंपरेतून नेतृत्त्व उभे राहते. जनता व नेतृत्त्व यांचे हे नाते निर्माण होण्याचे काम इतिहासकाळात घडावे लागते.

❑

काहीवेळा अनेक मार्ग समोर दिसतात. या मार्गाने गेलो तर मुक्कामावर पोहोचू की त्या मार्गाने गेलो तर पोहोचू, असा ज्यावेळी मनात संभ्रम निर्माण होतो त्यावेळी नेमके कोणत्या मार्गाने गेले पाहिजे हे ज्याला समजेल, तो नेता. नेत्याची माझी व्याख्या ही अशी आहे.

❑

आपल्याकडे निवडणुका आल्या की, आपण जागे होतो. मग कोण कोण कार्यकर्ते आहेत, कोणा कोणाच्या मनात बाशिंग बांधावयाचे आहे, याचा शोध सुरू होतो. परंतु अशी परिस्थिती असणे उपयोगाचे नाही. ग्रामीण पद्धतीने सांगावयाचे झाले, तर पहिलवान असा तयार असला पाहिजे की, सांगेल तेव्हा तो कुस्तीला उभा राहील. अगोदर करार करून आणि मग खुराक खाऊन, अमक्या अमक्या तारखेला कुस्ती लढतो असे म्हणणे ही कुस्ती नव्हे. बोलणे झाल्याबरोबर अर्ध्या तासाच्या आत तो दानात आला पाहिजे आणि कुस्ती झाली पाहिजे.

❑

मला अभिप्रेत असलेला समाजवाद हा केवळ एक आर्थिक सिद्धांत नाही. तो मूल्यावरही आधारलेला आहे. समाजातील प्रत्येक व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास, हा आपल्या विचाराची व आचाराची आधारशीला असली पाहिजे. पिढ्यान्‌पिढ्या हरिजन आणि गिरिजन यांची अवहेलना होत आहे. त्यांच्यावर अन्याय होत आहेत. सामाजिकदृष्ट्या नि आर्थिकदृष्ट्या त्यांचे शोषण चालू आहे. राष्ट्रीय जीवनाच्या मंझधारेपासून त्यांना अलग करण्यात आले आहे. आपल्या राष्ट्रीय जीवनातील हे वैगुण्य आपण किती लवकर नाहिसे करणार आहोत, यावरच आपल्याला समाजवादाचा कोणता आशय अभिप्रेत आहे हे ठरणार आहे. जोपर्यंत हे वैगुण्य दूर होत नाही तोपर्यंत सामाजिक उद्दिष्टांची चर्चा करणे निरर्थक आहे. ते काम सोपे नाही. समाजाचे महावस्त्र नव्याने विणावयाचे आहे. त्यासाठी गरज आहे ती समर्पणशीलतेची आणि ध्येयवादी आवेशाची.

❑

राजकारणात एखादे पद प्राप्त झाले की, त्याला नेता म्हणायचे, ही सवय जितक्या लवकर दूर होईल, तितकी त्याची गरज आहे. राजकारणातला प्रमुख म्हणजे समाजाचाही नेता ही चुकीची व्याख्या आहे. नेतृत्त्व हा शब्द व्यापक अर्थाचा आहे. वेगवेगळ्या शास्त्रांत प्रगती घडत आहे. वेगळे आदर्श निर्माण होत आहेत. त्याचा काही सामूहिक परिणाम घडत आहे. हा सामूहिक परिणाम घडविणारे त्या त्या क्षेत्रांतील जे कोणी आदर्श असतील ते खरे नेते. नव्या आदर्शाचा संपूर्ण समाजजीवनावर परिणाम करण्यासाठी, त्याचा वापर करणारी जी माणसं असतात, त्यांच्या ठिकाणीही नेतृत्त्व असतेच. नेतृत्त्वात शहरी आणि ग्रामीण असा भेदभाव करण्याचेही कारण नाही.

❑

माणसांच्या मनाची मशागत करणे आणि त्यांचे आदर्श परिणाम घडवून आणणे या नेतृत्त्वाच्या कसोट्या मानल्या तर टिळक, गांधी, नेहरू यांनी त्या अर्थाने खरे नेतृत्व केले. त्यांच्या नेतृत्त्वाला काही एक वेगळा अर्थ आहे. टिळक, गांधी यांच्या हाती सत्ता कधीच नव्हती. त्या दृष्टीने सरकारचे नेतृत्त्व म्हणजे समाजाचे नेतृत्त्व असे मानणे अपुरे आणि अशास्त्रीय आहे. याचा अर्थ राज्याचे नेतृत्त्व करणारे समाजाचे नेतृत्त्व करू शकत नाहीत, असा नव्हे.

❑

मला कोणी एखाद्या काँग्रेसवाल्याची परीक्षा करावयास सांगितली, तर प्रथम मी त्याची नाडी तपाशीन, म्हणजे त्याच्यामध्ये जिद्द आहे की नाही हे मी प्रथम पाहीन. तो हुशार असेल पण त्याच्यात जिद्द नसेल, तर त्याचे काँग्रेसप्रेम माझ्या उपयोगाचे नाही. एक जुनी कहाणी सांगतात की, रामाला युद्धात विजय मिळाला आणि लंकेहून परत आल्यानंतर सीतामाईने हनुमानाला नवरत्नांचा हार दिला. त्याने तो हातात घेतला आणि त्या नवरत्नांतले प्रत्येक रत्न त्याने दाताने फोडले. सीतामाईने ते पाहिले आणि त्याला ती म्हणाली, "शेवटी वानर तो वानरच. तुला मी नवरत्नांचा हार दिला त्याचे तू हे काय केलेस? कशाकरिता तू ही रत्ने फोडलीस?" तेव्हा त्याने उत्तर दिले, "या नवरत्नांत कोठेतरी आत राम आहे की नाही ते मी पाहिले; आणि त्यात जर राम नसेल तर या नवरत्नांचा मला काय उपयोग आहे?" त्याचप्रमाणे कोणत्याही काँग्रेसवाल्यामध्ये अन्यायाविरुद्ध लढण्याची, गरिबीविरुद्ध लढण्याची, विषमतेविरुद्ध लढण्याची जिद्द आहे की नाही, या सर्व गोष्टींसंबंधी त्याच्या मनात तिरस्कार आहे की नाही , त्याविरुद्ध झगडण्याची त्याच्या मनात ईर्षा आहे की नाही हे मी पाहीन. ही जिद्द, ही ईर्षा जर त्याच्यात नसेल, तर माझ्या मताने तो मृत काँग्रेसवाला आहे. ❑

आपल्याला लोकांच्या जीवनातील दैन्य व दारिद्र्य नाहीसे करायचे आहे. त्यासाठी आपण विकासाचा कार्यक्रम हाती घेतला आहे, पण विकासाच्या कार्यक्रमात आपण गुंतलो असताना आपले राजकीय विचारांचे ज्ञान ताजे ठेवले पाहिजे. आपण कशासाठी व कोणासाठी विकासयोजना राबवीत आहोत, याचे ज्ञान दिलोदिमागामध्ये असले पाहिजे. कार्यकर्त्यांचा राजकीय विचार पक्का पाहिजे. विद्यमान परिस्थितीचे सम्यक ज्ञान व जळते प्रश्न त्याला माहीत असले पाहिजेत आणि आपल्या वाचनातून व परिस्थितीच्या निरीक्षणातून त्याला त्या प्रश्नांची उत्तरे मिळाली पाहिजेत. आज आपल्यापुढे जरूर काही ज्वलंत प्रश्न आहेत. प्रश्न नसलेले हे जीवन राहणार नाही. हे प्रश्न सोडविण्यासाठी लागणारा आत्मविश्वास व विचार काँग्रेसजवळ निश्चितपणे आहे.

❑

व्यक्तीच्या किंवा देशाच्या जीवनामध्ये जेव्हा संशयाचे, संभ्रमाचे, संकटाचे प्रश्न निर्माण होतात, तेव्हा आपल्या मूलभूत तत्त्वांची आठवण करणे अतिशय महत्त्वाचे असते, असे मी मानतो. अर्जुनाला संभ्रम निर्माण झाला त्या वेळी त्याला भगवान श्रीकृष्ण भेटले; पण तुम्हां-आम्हांला थोडेच भगवान श्रीकृष्ण भेटणार आहेत? तुमचे-आमचे भगवान श्रीकृष्ण म्हणजे आपली मूलभूत तत्त्वे, आपले मूलभूत सिद्धांत.

❑

पक्ष चालतात ते निष्ठेने चालतात हे जरी खरे असले, तरी लोकशाही पक्ष हे विचारांच्या निष्ठेने चालले पाहिजेत, असा तुमचा-आमचा आग्रह असला पाहिजे. व्यक्तीवरच्या निष्ठा चुकीच्या आहेत. त्या निष्ठा काम देत नाहीत. कारण व्यक्ती शेवटी चूक करू शकते. मनुष्य कितीही मोठा असला, तरी त्याच्या हातून चूक होणार नाही असे कोणीही करू शकणार नाही.

❑

आपण माझा शिवाजीमहाराजांबरोबर आणि लोकमान्य टिळकांबरोबर उल्लेख केला. पण या सर्व खोट्या तुलना आहेत. या खोट्या तुलनेमध्ये तुम्ही फसू नका आणि कृपा करून मला फसवू नका, असे माझे सांगणे आहे. एकच शिवाजीमहाराज होऊन गेले आणि एकच टिळक होऊन गेले. महाराष्ट्राचा इतिहास ज्यांनी घडवला ते शिवाजीमहाराज आता पुन्हा निर्माण होणार नाहीत. ब्रिटिशांच्या सत्तेखाली दबलेल्या हिंदुस्थानला स्वराज्याचा जन्ममंत्र देणारे लोकमान्य टिळक एकदाच होऊन गेले, ते आता पुन्हा होणार नाहीत; पुन्हा होणार नाहीत असे म्हणण्याचे कारण हिंदुस्थान पुन्हा परतंत्र होणार नाही.

❑

आज आपली ही जी छोटी छोटी राज्ये झाली आहेत, त्यांच्याकडे आपण आपल्या विकासाचे एक साधन म्हणून पाहिले पाहिजे; पण छोटी छोटी राज्ये होऊनही पूर्वीचे हेवेदावे कायम राहणार असतील, तर ते एक संकटच ठरेल. ह्या साधनांचा उपयोग लोककल्याणासाठी होतो आहे किंवा नाही, हे आपण पाहिले पाहिजे. ह्या कसोटीवर महाराष्ट्र राज्य उतरत नसून महाराष्ट्र राज्यापासून विदर्भाचे नुकसान होत आहे, अशी माझी खात्री करून दिली, तर मी स्वतःच हे महाराष्ट्र राज्य मोडून टाकीन.

❑

कोठलाही विचार हा क्रियाशील होण्यापूर्वी भावनेने समजून घ्यावा लागतो आणि जर भावना अपुरी असेल किंवा चुकीची असेल, तर तीतून येणारा निर्णय, तीतून येणारा विचार हा अपुरा आणि चुकीचा असण्याची शक्यता असते आणि म्हणून 'अवेअरनेस'ची अतिशय आवश्यकता आहे.

❑

आज येथे मुर्दाबाद म्हणणारी जी काही माणसे आहेत, त्यांना आपण गडबड न करता ते म्हणण्याची परवानगी द्या. कारण, अगदी न्यायाचा तराजू हातात धरून आज मी माझे स्वत:चे वजन करून घेणार आहे. मला मिळालेल्या झिंदाबादचेही मी वजन करणार आहे आणि मुर्दाबादचेही वजन करणार आहे. शेवटी जे माझ्या पदरात राहील, तेवढेच माझे म्हणून शिल्लक राहणार आहे. लोकांनी काही हार घातले म्हणून मी फार बिघडून गेलेलो नाही, किंवा कोणी मुर्दाबाद म्हटल्याने बिघडून जाणार नाही. मुर्दाबाद म्हणणाऱ्यांना माझे धन्यवाद आहेत. कारण, मुर्दाबाद म्हणणाराही माझी आठवण करतो, असाच त्याचा खरा अर्थ आहे. या मुर्दाबादच्या घोषणेतून मी फार वेळा गेलो आहे. आगीतून जाण्याची मला सवय आहे. मुर्दाबाद म्हणणारे जितके जास्त मुर्दाबाद म्हणतात, तितका माझा जास्त विजय होतो, असा आतापर्यंतचा माझा अनुभव आहे.

❑

कुठल्याही राजकीय पक्षामध्ये थोडेच लोक असतात. बहुसंख्य जनता ही पक्षाच्या बाहेर असते, असे माझे स्वत:चे मत आहे. आणखी ती काही अमक्याच एका पक्षाला बांधली गेलेली असते, असेही नाही. आपला मार्ग युक्त आहे आणि चांगला आहे, हे या जनतेला पटविण्याची जबाबदारी त्या त्या पक्षावर असते. जो पक्ष हे करतो, तो राजकारणामध्ये यशस्वी होतो असा आतापर्यंतचा अनुभव आहे.

❑

आमचे काही विरोधी मित्र, छोट्या-छोट्या प्रश्नांची दुखणी घेऊन त्यांचा महाराष्ट्रभर बाजार मांडण्याचा प्रयत्न करताना दिसतात. त्यांना मला सांगावयाचे आहे की, या छोट्या-छोट्या प्रश्नांच्या चिंध्या जमविण्यासाठी आपण जेवढा वेळ खर्च करीत आहात, त्यांपैकी निम्मा वेळ तरी महाराष्ट्राच्या भवितव्याच्या दृष्टीने आज ज्या महत्त्वाच्या समस्या आहेत, त्यांच्या विचारासाठी द्या.

❑

"व्हेनेवर इन डाऊट, प्ले दी ट्रम्प" असा नियम आहे. राजकारणामध्ये आणि देशाच्या जीवनामध्ये जेव्हा संभ्रम निर्माण होतो, तेव्हा आपण हुकमाचा पत्ता हातात घेतला पाहिजे आणि आपला हा हुकमाचा पत्ता, म्हणजे आपली मूलभूत तत्त्वे आणि आपले मूलभूत सिद्धांत.

❑

मी मागे युद्धाच्या काळात एक व्यंगचित्र पाहिले होते. कोणाबद्दलचे होते ते मी सांगत नाही. या व्यंगचित्रामध्ये जो प्रमुख आहे, त्याने सैन्याला "क्विक मार्च" म्हणून ऑर्डर केली आहे. त्याप्रमाणे सैन्य चालू लागते आणि प्रवास करीत करीत ते समोर असलेल्या एका कड्यापर्यंत येऊन पोहोचते. एक माणूस त्या प्रमुखाला सांगितो की, "सैन्य कड्यापर्यंत पोहोचले आहे, .आता पुढची ऑर्डर द्या." तो प्रमुख ऑर्डर देतो, "गुडबाय." आपले सैनिक कोणत्या तरी खड्ड्यात जाऊन पडण्यासाठी "गुडबाय" ऑर्डर देणारा मी सेनापती नाही. मला जनतेचे प्रश्न सोडवावयाचे आहेत. जिथपर्यंत जाणे शक्य असेल, तेवढ्याच मर्यादेपर्यंत जाण्याचा मार्ग मला स्वीकारला पाहिजे.

❑

जनतेला सांगितले पाहिजे की, तू राजा आहेस. अविकसित, दुष्काळी अशा कडेकपारीच्या बनलेल्या सह्याद्रीचा तू राजा आहेस. दुःखात असलेल्या जनतेच्या जीवनावर सुखाची सावली निर्माण करणे हे राजाचे कार्य प्रत्येक मराठी माणसाने केले पाहिजे. एकेक माणूस, एकेक लहान मूल हे सावली देणारे झाड आहे, असे मानून खतपाणी घातले पाहिजे.

❑

श्रेय मागून कुणी देत नाही आणि असलेले कोणी हिरावून घेतो म्हटले, तरी घेऊ शकत नाही.

❑

महाराष्ट्राच्या चार प्रवृत्ती आहेत असे मी मानतो. ज्ञानेश्वरांच्या रूपाने संतप्रवृत्ती, शिवाजींच्या रूपाने पराक्रम, महात्मा जोतिबा फुले यांच्या रूपाने स्वार्थत्याग आणि लोकमान्य टिळकांच्या रूपाने विद्वत्ता व राजकारण महाराष्ट्रापुढे उभे आहे.

❑

चांगले म्हणणाऱ्यालाच दोष देण्याचा अधिकार असतो. मुलाला मारण्याचा हक्क सख्ख्या आईला असावा. सावत्र आईला नसावा. आणि कायदाच करावयाचा असेल, तर बापाला मुळीच नसावा. कारण, येथे मारणाऱ्या डोळ्यांतही मार खाणाऱ्याप्रमाणेच पाणी येते. सख्ख्या आईशिवाय हे शक्य नाही आणि जनता ही आईच आहे असे मी मानतो.

❑

जातीयवादी राजकारण म्हणजे काय? जेव्हा तुम्ही राजकारणाचा विचार करता, आणि मी हिंदू आहे व हिंदुत्वाचा मला विचार केला पाहिजे, माझ्या हिंदुत्वाला जास्त प्रतिष्ठा प्राप्त झाली पाहिजे, किंवा माझ्या इस्लामला जास्त प्रतिष्ठा मिळाली पाहिजे, असा ज्या वेळी तुम्ही मनात विचार आणता त्यावेळी राजकारण जातीयवादी बनते. या जातीयवादी राजकारणाचा दुसराही एक भाग महत्त्वाचा आहे. जे लहान लहान अल्पसंख्य आहेत त्यांच्या मनामध्ये संशय निर्माण झाला, शंका निर्माण झाली, तर ती समजण्यासारखी आहे; परंतु जो बहुसंख्य समाज आहे तोच जर जातीयवादी झाला तर राष्ट्र संपले म्हणून समजावे.

❑

आम्ही या देशाचे किंवा त्या देशाचे मित्र आहोत असे जाहीर करणे म्हणजे अलिप्ततावाद नव्हे, तर आपल्याला सर्वांचेच मित्र व्हावयाचे आहे ही मूलभूत गोष्ट आहे. आपण जागतिक शांततेचे पुरस्कर्ते आहोत, कारण जागतिक शांततेखेरीज प्रगती अशक्य आहे. पण आम्हांला जागतिक शांतता हवी असे जेव्हा आपण म्हणतो, तेव्हा अमुक वा तमुक देशाशीच आम्ही मैत्री करू, असे आपल्याला म्हणता येणार नाही.

❑

सामान्यपणे समाजवादाच्या माझ्या कल्पनेने तीन कसोट्या आहेत. सर्वांना समान संधी ही त्यातली पहिली कसोटी. खरे म्हणजे ही लोकशाहीची व्याख्याच मानली गेली होती. परंतु राजकीय लोकशाहीचा अनुभव नसल्यामुळे तिच्यातून मग समाजवादाचा विचार निघाला आणि सर्वांना समान संधी ही समाजवादाची एक कसोटी समजली गेली. नंतर उत्पादनाच्या पाठीमागची प्रेरणा, ही वैयक्तिक नफेबाजीपेक्षा समाजाच्या सुखाची, समाजाच्या हिताची असली पाहिजे, ही समाजवादाची दुसरी कसोटी. आणि उत्पादनाबरोबरच त्याच्या विभागणीचा प्रश्नही तितकाच महत्त्वाचा असल्यामुळे, ही विभागणी होत असताना लोकांच्या गरजा आणि त्यांच्या विकासाची शक्याशक्यता यासंबंधीचा विचार ही समाजवादाची तिसरी कसोटी होय.

❑

देशाच्या आर्थिक प्रगतीचे जे तत्त्व आपण स्वीकारले आहे, त्या तत्त्वाचा आपल्याला त्याग करता येणार नाही. ज्या दिवशी ह्या तत्त्वाचा आपण त्याग करू त्या दिवशी देशाच्या संरक्षणाच्या प्रश्नांची धुळधाण होईल, हे आपण नक्की समजा. माझ्या या सगळ्या म्हणण्याचा सारांश असा की, देशाची अंतर्गत नीती, परराष्ट्रनीती आणि देशाची संरक्षणनीती ही परस्परावलंबी असतात, एवढेच नव्हे तर राष्ट्रीय नीतीच्या एकाच सूत्राची ही केवळ वेगवेगळी रूपे असतात. कुठल्याही देशाची संरक्षणाची नीती अलग, परराष्ट्रनीती अलग आणि अंतर्गत आर्थिक नीती अलग, अशी परिस्थिती निर्माण झाली म्हणजे त्या देशाचे भवितव्य धोक्यात येते.

❑

हिंदुस्थानचे स्वातंत्र्य हिरावून घेऊन येथे स्वतःचे अधिराज्य इंग्रजांनी निर्माण केले होते, त्यांनीच येथून जाताना एक विषारी

विचार पाठीमागे सोडून दिला. हा विषारी विचार हिंदुस्थानच्या दृष्टीने शाप ठरला आणि या विषारी विचारातूनच पाकिस्तानचा जन्म झाला. तो विचार हा की, येथील मुसलमान हा एक स्वतंत्र देश आहे. धर्म हा एक स्वतंत्र देश बनू शकतो, हा भयानक विचार जर हिंदुस्थानने स्वीकारला तर, हिंदुस्थानला हिंदुस्थान म्हणून राहण्याची शक्यताच नाही.

❑ ❑

# विकास



जहाजांच्या तांड्याची गती सर्वांत कमी वेग असणाऱ्या जहाजाने नियंत्रित होते, अथवा साखळीचा बळकटपणा हा जसा तिच्या दुव्यातील सर्वांत कमजोर अशा दुव्यावरच अवलंबून असतो, त्याप्रमाणे सबंध देशाच्या दृष्टीने विचार केल्यास देशाचे सामर्थ्य हेही त्यातील सर्वांत दुबळ्या घटकानेच नियंत्रित होते असे दिसून येईल. अविकसित विभागांचा व प्रदेशांचा आपण प्रथम विचार केला पाहिजे.

❑

गतिमान विकासासाठी कोणते तंत्र स्वीकारावे याचा विचार आपण केला पाहिजे. देशात ज्यावेळी काही वस्तूंची तीव्रतेने टंचाई भासू लागते, त्यावेळी त्या वस्तू आम्हांला मिळाल्याच पाहिजेत, अशा घोषणा करून चालत नाही, रागावून भागत नाही, तर आहेत त्या गोष्टी स्वीकाराव्या लागतात. त्या वस्तूंची कमतरता दूर करण्यासाठी प्रयत्न करावा लागतो. हे करीत असताना काही शिस्त स्वीकारावी लागते. याचा अर्थ केवळ अधिक कष्ट करा आणि कमी खा असा नाही. जेव्हा विकासाच्या मोठ्या यात्रेमध्ये तुम्हां-आम्हांला या देशाला पुढे घेऊन जावयाचे आहे तेव्हा काही कठोर शिस्त या देशाने स्वीकारली पाहिजे. प्रगत देशामध्ये आढळणाऱ्या सुखसोयींचा हव्यास आणि गरिबी हटविण्याची गरज, या दोन्हींचे लग्न विकसनशील देशात लागत नाही हे आपण ओळखले पाहिजे.

❑

आजच्या हिंदुस्थानच्या संदर्भात त्याने आपल्या नियोजनाची दोन सर्वांत महत्त्वाची साधने सांगितली आहेत. त्यातले पहिले साधन म्हणजे मनुष्यबळ आणि दुसरे साधन म्हणजे वेळ. चाळीस कोटी लोकांचा हा देश काही न करता जर फुकट एक वर्ष बसून राहिला, तर आमची फार मोठी शक्ती वाया गेली असे होईल. कारण त्या श्रमाच्या बळावर आम्ही कितीतरी पुढे गेलो असतो; आणि दुसरे म्हणजे जग त्या काळात आमच्या कितीतरी पुढे निघून जाईल.

❑

सहकार चळवळीत आर्थिक सत्ता आहे याचीही जाणीव लोकांत आणि त्याचप्रमाणे सहकारी कार्यकर्त्यांत निर्माण झाली आहे. ही चळवळ एका अर्थाने सत्तेचे एक केंद्र आहे आणि सत्तेचे केंद्र म्हटले म्हणजे लोकशाहीचा अंकुश त्यावर ठेवलाच पाहिजे. तसे न केल्यास अनियंत्रित सत्तेमुळे विकासाचे हे शस्त्र दुधारी ठरेल अशी मला साधार भीती वाटते.

❑

महाराष्ट्राच्या भवितव्याची ही मोठीच मोठी, लांबच लांब सफर आहे... त्या सफरीतील आम्ही प्रवासी आहोत... ही सफर तुम्हां-आम्हांला पुरी करावयाची आहे... ती सफर आज मला माझ्या डोळ्यांसमोर दिसते आहे, विजेच्या प्रकाशाने लखलखल्यासारखी मला दिसते आहे... ती लांबची सफर आहे, कष्टाची सफर आहे, उद्योगाची सफर आहे... पण ती पुरी केलीच पाहिजे... कारण त्यात जनतेचे कल्याण आहे...

❑

जगातील अविकसित देशांपुढे असलेल्या या सर्व अडचणींत आणखी एका अडचणीची भर पडली आहे. ती म्हणजे या देशामधील लोकांत सामाजिक दृष्टिकोन व जीवनप्रवृत्ती यांत फार मोठी तफावत पडल्यामुळे, देशाच्या आर्थिक प्रगतीच्या आणि सामाजिक व राजकीय ऐक्याच्या मार्गातील एक धोंड ठरली आहे. ही परिस्थिती बदलण्यासाठी कोणती उपाययोजना करावी, हा प्रश्न या अविकसित देशांना गेली अनेक वर्षे भेडसावीत आहे. आता हे देश लोकांच्या राहणीच्या मानात कमीत कमी काळात वाढ करण्याच्या विचारांनी प्रेरित झाले असल्यामुळे, आर्थिक विकासाचे काम सर्वस्वी खाजगी क्षेत्राच्या हाती ते सोपवू शकत नाहीत.

❑

जेव्हा विकासाच्या या मोठ्या यात्रेमध्ये तुम्हां-आम्हांला आपल्या देशाला पुढे घेऊन जावयाचे आहे, तेव्हा काही कठीण शिस्तीचे प्रयोग आपल्याला या देशामध्ये स्वीकारावे लागतील. प्रगत देशांमध्ये आढळणाऱ्या सगळ्या सुखसोयी आणि गरिबी हटविण्याची गरज या दोन्हींचे लग्न लागत नाही, हे आपण आता ओळखले पाहिजे.

❑

ग्रामीण विरुद्ध नागरीकरण हे प्रश्न एकमेकांत इतके गुंतलेले आहेत की, एकाच्या सुखाचा, दुसऱ्याच्या दुःखाशिवाय आपणाला विचारच करता येत नाही. खेडे आणि शहर यांची सुखदुःखे ही अशी परस्परांशी भिडलेली, परस्परात मिसळलेली आहेत.

❑

आम्हांला आकाशात भराऱ्या मारावयाच्या नाहीत. आम्हांला जमिनीवर चालावयाचे आहे आणि येथे टिकावयाचे आहे आणि त्याचबरोबर जमिनीवरून 'टेक ऑफ' –उड्डाण कसे करता येईल, इकडे आमची दृष्टी सतत राहिली पाहिजे.

❑

आपल्या शेतीचा प्रश्न हा या आंधळ्याच्या गोष्टीतल्या हत्तीसारखाच फार मोठा प्रश्न आहे. कोणाला या प्रश्नाचा हा भाग दिसतो तर कोणाला तो. पूर्वी रामाला रावणाशी लढताना फक्त दहाच तोंडाच्या रावणाशी लढावे लागले होते; परंतु या शेतीच्या प्रश्नाशी लढावयाचे म्हणजे शंभर तोंडे असलेल्या रावणाशी आपणाला लढावे लागणार आहे. आपल्या शेतीचे प्रश्न अनेकविध आहेत. लहान मुदतीच्या कर्जाचा प्रश्न आहे, दीर्घ मुदतीच्या कर्जाचा प्रश्न आहे, बागायतीचा प्रश्न आहे, बियाण्यांचा प्रश्न आहे, खतांचा प्रश्न आहे, तुकडेबंदीचा प्रश्न आहे, असे अनेकविध शेतीचे प्रश्न आहेत आणि हे प्रश्नही नेहमी बदलत राहणार आहेत. दुर्दैवाने आपल्या देशामध्ये शेतीचा विकास अनेक शतके थांबला होता. दहा-पाच वर्षे तो थांबला असता, तर ती मोठी काळजी करण्यासारखी गोष्ट ठरली नसती; परंतु शेकडो वर्षे खितपत पडलेला असा हा प्रश्न असल्यामुळे त्यावर पुष्कळच विचार झाला पाहिजे.

❑

शेतीच्या शास्त्रीय शिक्षणाचा दृष्टिकोन लोकांमध्ये वाढविला पाहिजे. यासाठी येथे शिकणारे शेतीचे सगळे स्नातक निव्वळ शेतकी खात्याचे अधिकारी होऊन जाणार असतील आणि जावयाच्या शर्यतीमध्ये त्या निमित्ताने पुढे सरकणार असतील, तर मी असे म्हणेन की, ती दुसरी शोकपर्यवसायी गोष्ट होईल. येथे शिकलेला मनुष्य शेतकरीही होऊ शकला पाहिजे, तसे त्याने झाले पाहिजे.

❑

तुमची शेती हा निव्वळ तुमचा विचार राहिलेला नाही. तुमची शेती हा देशाचा विषय झाला आहे. आम्ही आमची शेती पिकविली नाही, तर आम्ही आमच्या घरामध्ये उपाशी राहू, असे म्हणून तुम्हांला आता चालणार नाही. तुमची शेती तुमची आहे, पण तशीच ती देशाचीही आहे. तुमची शेती पिकली नाही, तर तुमचे नशीब पिकणार नाही एवढाच त्याचा अर्थ नाही, तर त्याचबरोबर देशाचेही नशीब पिकणार नाही.

❑

भगीरथ राजाने गंगा जमिनीवर आणली, पण त्याने गंगा आकाशातून आणली नाही. स्थापत्यशास्त्राचे चांगले ज्ञान असलेला तो शहाणा मनुष्य असला पाहिजे. तिकडे बाजूला तोंड करून जाणाऱ्या नदीला त्याने मधला एखादा खडक फोडून गंगोत्रीपर्यंत वळवून आणले असावे, आणि मग त्याने गंगेला खाली उतरविली असावी.

❑

डोंगरपठाराला ही सभा बसली होती. सभेला सुरुवात होताच सहकारी शेतीची तत्त्वे आणि शेतीच्या उत्पादनाची महत्त्वाची मूल्ये त्या पुढाऱ्याने सभेतल्या लोकांपुढे सांगावयाला सुरुवात केली. सकाळची वेळ होती. इतक्यात त्या कोवळ्या उन्हामध्ये त्या डोंगरपठारावरून दोन-चार ससे पळत असताना सभेतील लोकांनी पाहिले; आणि त्याबरोबर तत्त्वांचा आणि शेतीच्या उत्पादनाचा विचार सोडून देऊन ते सगळे लोक त्या सशांच्या पाठीमागे पळत सुटले. कारण त्यांनी असा विचार केला की, हे घेतलेले सहकारी तत्त्व आणि यातून वाढणारे शेतीचे उत्पादन हे पुढच्या वर्षी किंवा त्याच्या पुढच्या वर्षी केव्हातरी पदरात पडणार आहे. आज संध्याकाळची मेजवानी ह्या सशांच्यावर होणार आहे. लहानशीच गोष्ट आहे, परंतु तीत पुष्कळसे तथ्य आहे.

❑

आजही साडेतीन कोटी एकर जमीन महाराष्ट्रात अशी आहे की, जी गळक्या भांड्यासारखी आहे. मथुरेची गवळण पाणी भरून डोक्यावर हंडा घेऊन निघाली आणि घरी येऊन पाहते तो आपल्या डोक्यावरच्या हंड्यामध्ये पाणी नाही. तसेच आपल्या शेतीचे झाले आहे. दरवर्षी मृग नक्षत्रापासून हस्त नक्षत्रापर्यंत भरलेल्या नक्षत्रांच्या बाजारामध्ये आपल्या डोक्यावर भांडे घेऊन जाते बिचारी आमची शेती. पण त्यात शेवटी काही शिल्लक राहत नाही. आमच्या महाराष्ट्राच्या शेतीचा हा मथुरेचा बाजार झालेला आहे.

❑

जसजसे उत्पादन वाढेल, तसतसा राष्ट्रीय भाकरीचा (नॅशनल केक) आकारही वाढेल. जीवन-कलहाची तीव्रता कमी होईल आणि दुसऱ्याच्या तोंडातून घास काढल्याशिवाय आपल्या तोंडात घास जाणार नाही, ही परिस्थिती बदलेल. दोघांचीही कमाई वाढते, कारण उत्पन्न वाढलेले असते. अर्थात याचा अर्थ असा नव्हे की, केवळ उत्पादनवाढ झाल्याने दारिद्र्याचा प्रश्न आपोआप सुटेल. विकासाच्या लाभाचे न्यायोचित वाटप झाले पाहिजे, अशी दक्षता घेणारे राष्ट्रीय धोरण आम्ही आखले पाहिजे. विकसनशील अर्थव्यवस्थेत सामाजिक संघर्ष अधिक सुलभतेने मिटविता येतात अशी माझी धारणा आहे. या देशाची उत्पादनप्रक्रिया गतिमान होईल व समग्र राष्ट्रीय उत्पन्नामध्ये वाढ होईल, या माझ्या आशावादाशी तुम्हीही सहमत असाल, तर भारतातील वर्गसंघर्ष दिवसेंदिवस कमी होतील असे तुम्हांलाही वाटेल. असे हितसंघर्ष उद्‌भवले असता, सरकारने उदासीन राहिले पाहिजे असे मला वाटत नाही. दुबळ्या जनतेला शक्ती देण्यासाठी सरकारने धावून गेले पाहिजे आणि कमजोर व शक्तिवान यांच्यामध्ये सुरू असलेल्या विषम लढतीचे तुल्यबळ लढतीत रूपांतर केले पाहिजे. कुठल्याही राज्यात संपूर्णपणे सामाजिक शांतता नांदेल अशी कल्पना करणे अवास्तव आहे. संघर्ष सतत उद्‌भवत राहतीलच. संघर्षात सरकारने धटिंगणांविरुद्ध गरिबांची बाजू घेतली पाहिजे; परंतु त्याचबरोबर कार्यक्षमता वाढीचीही दक्षता घेतली पाहिजे. कमजोराला कुबड्या देऊन नव्हे, तर त्याच्या अंगात कार्यक्षमतेची धमक निर्माण करून त्याला सहाय्यभूत होणे ही सरकारची जिम्मेदारी आहे. 'परिश्रमनीतीचा' सर्वांत:करणाने स्वीकार केल्यानेच देशाला ऐश्वर्य व समृद्धी प्राप्त होत असते.

❑

उत्पादनाच्या बाबतीत ज्याला एक प्रकारची शिस्त म्हणतात, ती आपण स्वत:च घालून घेतली पाहिजे. कारखानदारांमध्ये, कामगारांमध्ये आणि शासनामध्ये खराखुरा शांततेचा करार होऊन 'बंद'ची भाषा बंद झाली पाहिजे. जर काही बंदच करावयाचे असेल, तर हे बंद करण्याचे धोरण बंद केले पाहिजे. संप होऊ नयेत, पण त्याबरोबर संप नाहीत म्हणून कामगारांवर अन्याय करण्याचे एखाद्या मालकाने ठरविले, तर त्यालाही चोरवाट सापडता कामा नये. त्याचाही विचार झाला पाहिजे.

❑

आर्थिक गुंतागुंतीतून निर्माण होणारे तणाव व दबाव यांमुळे आम्ही आमच्या राष्ट्रीय एकतेचे किंवा राष्ट्रीय सुरक्षिततेचे महत्त्व कमी मानणार आहोत किंवा काय; आणि आज हे बंद करून आणि उद्या ते बंद करून आम्ही आमचे नशीबच बंद करून घेणार आहोत किंवा काय, हा खरा महत्त्वाचा प्रश्न आहे.

❑

तांत्रिक जगाची आज जी झपाट्याने प्रगती होत आहे तिचे वर्णन करताना एक गृहस्थ म्हणाले होते की, "To remain where you are, you have to run very fast." तुम्ही जेथे आहात तेथेच तुम्हांला जरी थांबावयाचे असले, तरी त्यासाठीसुद्धा तुम्हांला फार वेगाने धावावे लागेल. तुम्ही अजिबात धावला नाहीत, तर पुढे जाण्याची गोष्टच सोडून द्या. तुम्ही आहात तिथे तर तुम्हांला राहता येणार नाहीच, उलट एकसारखे तुम्ही मागे पडत राहाल.

❑

विकास करावयाचा असेल, तेथील आर्थिक जीवन संपन्न करावयाचे असेल, तर ज्याप्रमाणे काही जिवंत पाण्याचे झरे असल्याशिवाय नदी वाहू शकत नाही त्याचप्रमाणे, जेथे जिव्हाळ्याच्या ज्या काही शक्ती असतील, त्या मोकळ्या केल्या पाहिजेत.

❑

चंद्रावर जाण्याचा प्रयत्न करावयाचा असला तरीही त्याच्यासाठी जमिनीवर जर पाय नसतील, तर चंद्राकडे जाण्याचा विचार करणे सुचणारच नाही. चंद्रावर जाणारे रॉकेट कसे तयार करावे याचा विचार शास्त्रज्ञाच्या डोक्यात चालवायचा असेल, तर त्याच्या पोटामध्ये प्रथम ज्वारीचा कण गेला पाहिजे. त्याशिवाय ते काम त्याला जमणार नाही. त्यामुळे कितीही मोठे प्रयत्न करावयाचे एखाद्या देशाने ठरविले, तरी जमिनीतून निर्माण होणाऱ्या उत्पादनावरच शेवटी माणूस अवलंबून असतो, असा सध्याचा अनुभव आहे.

❑

आजच्या दुनियेमध्ये आपण सगळ्या गोष्टींशी तडजोड केली तरी चालेल, पण माझे स्वत:चे असे मत आहे की, एका गोष्टीशी आपण बिलकूल तडजोड करता कामा नये; आणि ती म्हणजे गरिबी.

❑

16116
14111105

राज्यकर्ते आणि प्रशासक म्हणून आपण निर्जीव वस्तूंवर राज्य चालवीत नसतो, तर गतिमान सामाजिक घटना आपणास हाताळावयाच्या असतात, मानवी प्राण्यांचे प्रश्न आपणास सोडवावयाचे असतात आणि म्हणून मला जे सांगावयाचे आहे ते मी पुन्हा एकदा स्पष्ट करतो. आर्थिक प्रश्न हाताळण्याचे दोन मार्ग आहेत. विशिष्ट पद्धतीने आकडेवारी गोळा करणे, भांडवल गुंतविण्याच्या बाबतीत शास्त्रशुद्ध पद्धतीने अग्रक्रम ठरविणे, विकासाची गती निश्चित करणे आणि अशा रीतीने प्रश्नांचे उत्तर मिळाल्याचे आपल्या सद्सद्विवेक बुद्धीला सांगणे. हा झाला शास्त्रशुद्ध मार्ग. दुसरा मार्ग म्हणजे आपल्या भोवतीच्या प्रश्नांची सविस्तर पाहणी करून, त्यातील कोणते प्रश्न आपण सोडवले आहेत याची तपासणी करणे हा आहे.

❑

शेतीच्या क्षेत्रात आम्ही प्राचीन काळी पहिला शोध लावला हे आमचे कर्तृत्त्व मानले जाते; पण आज आम्ही अन्नाला महाग झालो आहोत ही गोष्टही तितकीच खरी आहे. आज कित्येक लाख टन धान्य बाहेरच्या देशांतून आपणास आणावे लागते. ते देश आपल्याला हे धान्य देतात हा त्यांचा मोठेपणा आणि गरज पडली म्हणजे आम्ही ते आणतो हा आमचा शहाणपणा. परंतु पोट भरण्याकरता आम्हांला दुसऱ्यांपुढे पदर पसरावा लागतो, हे राष्ट्र म्हणून या देशाला मुळीच अभिमानास्पद नाही.

❑

राज्य मोठे असो अगर लहान असो, त्या त्या राज्यात राहणाऱ्या लोकांची जी भाषा असेल तिचा तिथल्या शासनाचे, शिक्षणाचे व दैनंदिन व्यवहाराचे माध्यम म्हणून स्वीकार झाला नाही, तर लोकशाही शासन हे केवळ नावापुरतेच लोकशाही शासन राहील. लोकशाहीचा आत्माच ते हरवून बसलेले असेल. कारण जनतेची इच्छा हा लोकशाहीचा मूळ आधार असल्यामुळे लोकांच्या इच्छा, त्यांच्या अंतर्मनातील भावना व सुप्त संवेदना, त्यांच्या आशा-आकांक्षा यांना प्रकट रूप देण्याचा भार त्यांच्या भाषेनेच वाहिला पाहिजे ही गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट आहे.

❑

पंढरीच्या विठ्ठलाच्या या परिसरात, त्याच्या पंचक्रोशीत आज मोठ्या आनंदाने आलो आहे. येताना मी मनात विठ्ठलाला म्हणालो, चंद्रभागा तुझ्या अंगणात पोहोचण्यापूर्वीच आज आम्ही तिला अडवली आहे, तिला आम्ही आज साकडे घातले आहे. तुझ्या चरणांजवळ ही चंद्रभागा अठ्ठावीस युगे वाहत आली. या चंद्रभागेला उजनीजवळ आज आम्ही थांबवितो आहोत. महाराष्ट्रातील शेतकरी दरसाल आषाढी-कार्तिकी एकादशीला खांद्यावर पडशी टाकून "ग्यानबा तुकाराम" म्हणत म्हणत तुझ्या दाराशी येत असतो. त्या ग्यानबा तुकारामाच्या शेतीत आणि झोपडीत विठ्ठला आता तू जा. तिथे तुझ्या चंद्रभागेला तू भेट. जनाबाईच्या मदतीला तू धावून गेलास आणि तुझी मनापासून भक्ती करणाऱ्या तुझ्या सगळ्या भक्तांच्या मदतीलाही तू धावून गेलास. तशीच तुझी भक्ती करणाऱ्या आणि महाराष्ट्राच्या झोपडीत राहणाऱ्या गरीब शेतकऱ्याने आज तुझी चंद्रभागा अडविली आहे. त्यांच्या कल्याणासाठी, त्यांच्या मदतीसाठी "विठ्ठला, तू त्यांच्या शेतीत जा." तू आता पंढरपूरच्या मंदिरात राहू नकोस! विठ्ठलाला मी ही मनोभावे प्रार्थना केली आहे. तुकारामाची, ज्ञानेश्वराची, एकनाथाची आठवण करून मी ही प्रार्थना केली आहे. पण कृपा करून आपण हे मात्र लक्षात ठेवा की, निव्वळ प्रार्थनेने हे सर्व घडणार नाही. त्याकरिता तुम्हाला कष्टाची गंगा उपसावी लागणार आहे. त्यासाठी जिद्दीने काम करण्याचा आपण निश्चय करू या.

❑ ❑

# संरक्षण



भारताचे प्रतीक हिमालय आहे, तर महाराष्ट्राचे प्रतीक सह्याद्री आहे. उंच उंच शिखरे असलेला बर्फाच्छादित हिमालय हे भारताचे प्रतीक आहे, तर दोनशे-दोनशे, तीनशे-तीनशे इंच पावसाचा मारा आपल्या डोक्यावर घेणारा काळ्या फत्तराचा सह्याद्री आमचे प्रतीक आहे; आणि जर कधी भारताच्या हिमालयावर संकट आलेच तर आपल्या काळ्या फत्तराची छाती हिमालयाच्या रक्षणाकरता महाराष्ट्राचा सह्याद्री उभी करील, असे मी आपणाला आश्वासन देऊ इच्छितो.

❑

कुठे उत्तरेला कुणाच्या मनात पाप आहे, तर कुठे शेजाऱ्यापाजाऱ्यांच्या मनात पाप आहे; पण या पापांची मला भीती वाटत नाही. जोपर्यंत आमच्या मनगटामध्ये आणि आमच्या मनामध्ये सामर्थ्य आहे, तोपर्यंत इतरांच्या पापांची मला भीती वाटत नाही. तुमचे-माझे मन जर एकजिनसी झाले असेल, तुमच्या-माझ्या मनामध्ये जर काही सद्भावना असतील, तुमचे माझे मनगट जर एका सामर्थ्याने बांधले गेले असेल, तर मग आपल्याला कशाचीही भीती नाही.

❑

शक्तीने कोठलाही प्रश्न सोडवून घेण्याचा यापुढे प्रयत्न झाला, तर हिंदुस्थानची प्रतिक्रिया काय राहील याचा विचार करावा; आणि त्यांनी ह्याही गोष्टीचा विचार करावा की, जागतिक शांततेच्या प्रश्नाला मदत करणारे, शांततेच्या धोरणाने चालणारे, लोकशाही तत्त्वावर आधारलेले, सर्व धर्मांना समान मानणारे असे कोणते राष्ट्र हिंदुस्थानशिवाय या आशिया खंडात आहे? या राष्ट्राच्या आणि ज्या मूल्यांवर हे राष्ट्र आधारलेले आहे त्या मूल्यांच्या रक्षणाकरिता त्यांची शक्ती आणि त्यांच्या सत्प्रवृत्ती, त्यांचे आशीर्वाद आणि त्यांचे सद्भाव, या राष्ट्राच्या पाठीमागे उभे राहणार आहेत की, हुकूमशाहीच्या राजवटीने झिंगलेल्या आणि लढाईची भीती दाखवून इतरांना सतत संकटात टाकण्याचा विडा उचलणाऱ्यांना ते मदत करणार आहेत? आमच्या मते दुनियेतील पंचांच्या पुढे हाच आज खरा प्रश्न आहे.

❑

तलवारीने लढाई जिंकावी असा काळ आज राहिलेला नाही. आजचा काळ, आजचा जमाना, आपल्या विचारांची तलवार साफ आहे की नाही, आपल्या मनातल्या भावना साफ आहेत की नाहीत, आपल्या प्रतिज्ञा साफ आहेत की नाहीत हे पाहण्याचा आहे. आजची लढाई ही विचारांची लढाई आहे, एका अर्थाने ती तत्त्वांची लढाई आहे.

❑

आज आपणांपुढे पुष्कळच प्रश्न आहेत– विकासाचे प्रश्न आहेत, भाषांचे प्रश्न आहेत, विभागांचे प्रश्न आहेत; आणि अशाच प्रकारचे अनंत प्रश्न असेच सतत निर्माण होत राहणार आहेत; परंतु या सर्व प्रश्नांच्या पाठीमागे देशाच्या एकतेची जी भावना आहे, ती तुम्हां-आम्हांला कायम ठेवली पाहिजे, टिकवली पाहिजे. या भावनेला थोडासाही का होईना तडा गेला आहे असे ज्या दिवशी शत्रूला वाटेल, त्या दिवशी या देशावर पुन्हा निश्चित संकट येईल, हे आपण समजले पाहिजे.

❑

पूर्वी ह्या सह्याद्रीच्या माथ्यावर राज्याच्या रक्षणासाठी ठिकठिकाणी दुर्ग बांधण्यात आले होते. आता या डोंगरावरच्या किल्ल्यांनी राज्ये जिंकता येणार नाहीत. त्यासाठी तुम्हां-आम्हांला, तुमच्या आमच्या मनामध्ये निर्धाराचे दुर्ग उभे केले पाहिजेत.

❑

निव्वळ प्रेमाची भाषा बोलून प्रेम मिळत नाही. निव्वळ शांततेची घोषणा करून शांतता मिळत नाही. राष्ट्राच्या आणि समाजाच्या जीवनात मैत्री आणि शांतता टिकवायची असेल, तर त्यासाठी मनगटात शक्ती असावी लागते ही गोष्ट खरी असून तिचा अनुभव आपणास येतो आहे. दुनियेच्या बाजारात ही गोष्ट साफ आहे.

❑

भाडोत्री सैन्याच्या मदतीने आणि दुसऱ्याकडून उधारीने घेतलेल्या मदतीवर काही छोट्या-मोठ्या गरजा भागतात, पण देशाचा संसार चालविता येत नाही. तुम्ही-आम्हीसुद्धा खाजगी जीवनात उधार-उसनवारीने मागून आणतो. पण केव्हा? कधी एखाद्या वेळी अडले म्हणजे; पण सारखा उसनवारीने संसार चालला तर तो फार दिवस टिकत नाही. हिंदुस्थानातील चाळीस कोटी जनतेच्या स्वातंत्र्याचा संसार आपणास उभा करावयाचा असेल, तर तुमची-आमची शक्ती काय आहे व ती कशी वाढेल याचा विचार प्रथम झाला पाहिजे.

❑

स्वातंत्र्याचे रक्षण करण्याकरिता लागणाऱ्या शस्त्रांच्या निर्मितीचे सामर्थ्य दुसऱ्याकडे आणि स्वातंत्र्याची मालकी फक्त आमच्याकडे. अशाने स्वातंत्र्याचे रक्षण होत नाही. एवढेच नव्हे तर ते स्वातंत्र्यही खरे नव्हे.

❑

हिंदुस्थानचे रक्षण करावयाचे म्हणजे काय करावयाचे? हिंदुस्थानचे रक्षण करावयाचे याचा अर्थ फक्त आमच्या नागरिकांचे रक्षण करा एवढाच नाही. हिंदुस्थानचे रक्षण करावयाचे याचा अर्थ हिंदुस्थानने ज्या नवीन तत्त्वांची जोपासना केली, ज्या तत्त्वांच्या जोरावर आपले स्वातंत्र्य उभे केले ती तत्त्वे आणि ते स्वातंत्र्य यांचेही आम्हाला रक्षण करावयाचे आहे.

❑

आधुनिक लढाईमध्ये सैनिक तर लढतोच, पण त्या सैनिकाच्या पाठीमागे डावपेच आखणारा सेनापती, राज्यकारभार हाकणारा मंत्री, सैनिकाला शस्त्र पुरविणारा तंत्रज्ञ, कारखान्यात काम करणारा कामगार, शेतीचे उत्पादन वाढविणारा शेतकरी, सरकारी नोकरीत काम करणारा कर्मचारी यांपैकी प्रत्येक जण, शत्रुदेशातील आपापल्या क्षेत्रातील व्यक्तीबरोबर आधुनिक युद्धात लढत असतो. आधुनिक युद्धाचे हे वैशिष्ट्य आहे की, एका देशाची शक्ती, त्याची अर्थव्यवस्था, त्याचे कार्यकौशल्य, त्याची कार्यक्षमता ही दुसऱ्या देशातील शक्तीशी, अर्थव्यवस्थेशी, कार्यकौशल्याशी आणि कार्यक्षमतेशी लढाई करीत असते. एक संपूर्ण शक्ती दुसऱ्या संपूर्ण शक्तीशी लढत असते. तेव्हा ही लढाई दीर्घ काल चालू राहील या दृष्टीनेच तुम्हां-आम्हांला आता तयारी करावयाची आहे. या बाबतीत आपल्या मनात कोणत्याही प्रकारचा संदेह असता कामा नये.

❑

रणगाडा हे किती अजस्त्र शस्त्र आहे याची आपल्याला कल्पना येईल; पण तंत्रज्ञांनी कितीही नवीन नवीन शस्त्रे शोधून काढली असली, नवे शोध लावून कितीही नव्या सामर्थ्यांना जन्म दिला असला, तरी सगळ्यात मोठे सामर्थ्य शेवटी ईश्वराने निर्माण केले आहे आणि ते म्हणजे मनुष्य आणि त्याची जिद्द. त्याच्याइतके समर्थ शस्त्र आजपर्यंत निर्माण झालेले नाही.

❑

आजच्या या कठोर आणि गुंतागुंतीच्या दुनियेमध्ये केवळ दोस्तीसाठी कोणी लढाईस सज्ज होत नाही. मैत्रीसाठी लढाई पत्करणे यासारखा बावळटपणा दुनियेमध्ये दुसरा कोणता असू शकणार नाही. तुम्हांला तुमची तयारी करावयाची असेल, तर मित्रराष्ट्र म्हणवणारी राष्ट्रे तुम्हांला तुमच्या तयारीत मदत करण्याची तयारी दाखवतील. यापेक्षा मैत्रीची व्याख्या आजकाल अधिक लांबलचक होत नाही.

❑

आपली आर्थिक प्रगती आणि आपले संरक्षण हे दोन्ही प्रश्न एकमेकांशी संलग्न आहेत, एवढेच नव्हे तर ते या अलिप्ततेच्या धोरणाशी अत्यंत निगडित आहेत. आर्थिक प्रगतीच्या सगळ्या क्षेत्रांत शिरल्याशिवाय हिंदुस्थानच्या संरक्षणाची तुम्हां-आम्हांला तयारी करताच येणार नाही.

❑

आक्रमणाची मला भीती वाटत नाही. पण भीती वाटते ती एवढीच की, तुमचे-आमचे मन दुबळे बनेल की काय? तुमचे-आमचे मन दुफळीने फुटून जाईल की काय? ते होता कामा नये. एवढी शक्ती जर आपण या महाराष्ट्रामध्ये आणि भारतामध्ये निर्माण करू शकलो, तर दुनियेतल्या तोफांची, विमानांची किंवा ॲटम बॉम्बची शक्तीच काय, पण इतर कोणतीही शक्ती हिंदुस्थानचा पराभव करू शकणार नाही, असा माझा विश्वास आहे.

❑

आक्रमकाने दिल्ली काबीज केली की, हिंदुस्थान त्याच्या ताब्यात जात असे. जो आक्रमक दिल्लीमध्ये आपल्या नावाची ग्वाही फिरवील तो हिंदुस्थानचा बादशहा बने, असा आतापर्यंतचा मामला होता. सबंध देश जिंकण्यासाठी आक्रमक कधीच आमच्याकडे आला नाही. निदान लढाई करून सबंध देश कोणी जिंकला नाही. गावागावामध्ये लढाई झाली आणि आक्रमक एकेक गाव काबीज करीत गेला असे फारसे कधी घडलेले नाही. पंजाबातून आत शिरून आक्रमक दिल्लीमध्ये गेले आणि दिल्लीचे बादशहा झाले. मग ते लोदी असोत, घोरी असोत किंवा इतर कोणी असोत; परंतु आज हिमालयाच्या एका कोपऱ्यात परकीयांच्या सैन्याने पाऊल ठेवताच सबंध हिंदुस्थान बिजली चमकल्यासारखा जागा झाला आहे. हा बदललेला हिंदुस्थान एक हिंदुस्थान आहे, जागृत हिंदुस्थान आहे.

❑

देशाचे रक्षण करावयाचे म्हणजे काय हिमालयाचे रक्षण करावयाचे, की या देशातील गरिबीचे आणि भूकमारीचे रक्षण करावयाचे? या देशाचे रक्षण करावयाचे याचा अर्थ माझ्या मते असाली, या देशामध्ये स्वातंत्र्यप्राप्तीनंतर काही नवीन आशा निर्माण झाल्या आहेत, काही नवीन मूल्ये निर्माण झाली आहेत, काही नवीन अधिकार निर्माण झाले आहेत. एक नवा मानव हिंदुस्थानमध्ये बनतो आहे. लोकशाही समाजवादाच्या दिशेने वाटचाल करणाऱ्या या माणसाचे आपल्याला रक्षण करावयाचे आहे.

❑

संरक्षणाची तयारी करणे याचा खरा अर्थ आमच्या देशाच्या आर्थिक आणि तांत्रिक प्रगतीची गती वाढविणे हा आहे. संकट ही एक संधी आहे, या दृष्टीने संकटाकडे पाहण्यास आपण आता शिकले पाहिजे. माझा स्वत:चा अनुभव असा आहे की, संकटासारखी दुसरी संधीच असू शकत नाही. मी तर असे म्हणत असतो की, संकट आले म्हणजे परमेश्वर संधी घेऊन आपल्याजवळ आला आहे असे समजावे. आलेल्या संकटावर आपण मात केली पाहिजे, त्यावर आपण आरूढ झाले पाहिजे. घोड्यावर जसे आपण स्वार होतो त्याचप्रमाणे संकटाला आपले साधन बनवून, वाहन बनवून पुढे जाण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. संकट म्हणजे एक प्रकारचे आव्हान आहे. नुसते आव्हानच नव्हे, तर संधीही आहे.

❑

देशाची अंतर्गत आर्थिक नीती, देशाची परराष्ट्रनीती आणि देशाची संरक्षणनीती ही परस्परावलंबी असतात. एवढेच नव्हे तर राष्ट्रीय नीतीच्या एकाच सूत्राची ही केवळ वेगवेगळी रूपे असतात. कुठल्याही देशाची संरक्षणनीती अलग, परराष्ट्रनीती अलग आणि अंतर्गत आर्थिक नीती अलग अशी परिस्थिती निर्माण झाली, तर त्या देशाचे भवितव्य धोक्यात येते.

❑

तुझी बलिदानाची नुसती तयारी आम्हांला नको आहे. जीवनामध्ये देण्यासारखे तुझ्याजवळ उत्कृष्ट असे काही आहे असे तू सिद्ध करशील, तरच बलिदानावर तुझा अधिकार राहील.

❑

अणुबॉम्ब हे संरक्षणाचे शस्त्र आहे की सर्वनाशाचे शस्त्र आहे? हिंदुस्थानचा संरक्षणमंत्री या नात्याने माझी जिम्मेदारी ओळखून मी आपल्यासमोर बोलतो आहे. मी आपणाला सांगू इच्छितो की, अणुबॉम्ब हे संरक्षणाचे हत्यार नसून ते सर्वनाशाचे हत्यार आहे.

❑

हिंदुस्थानची कूस भाग्याची कूस आहे. जेव्हा जेव्हा संकटे निर्माण होतात तेव्हा तेव्हा त्या संकटांना तोंड देणारे सुपुत्र तिच्या उदरी जन्माला येतात, असा आतापर्यंतचा अनुभव आहे.

❑

चीनच्या हातातला पत्ता आता आम्हांला समजला आहे. तो सांगत असे की, माझ्या हातात मैत्रीचा पत्ता आहे म्हणून आम्हीही आमच्या हातात मैत्रीचा पत्ता धरून होतो. आता त्याने आपल्या हातातला पत्ता उघडा केला आहे. त्याच्या पत्त्यावर मैत्री लिहिलेली नाही. त्या पत्त्यावर समशेर कोरलेली आहे, बंदूक कोरलेली आहे, आक्रमण रेखाटलेले आहे. आता आम्हाला पूर्वीच्या मैत्रीच्या पत्त्याऐवजी शस्त्रास्त्रांचा पत्ता आमच्या हातामध्ये घेतला पाहिजे; पण आमच्या हातात मैत्रीचा पत्ता होता म्हणजे बावळटपणाचा पत्ता होता असे समजण्याचे कारण नाही. आमची नीती, फुलासारखे वागतील त्यांच्याशी फुलासारखे वागावयाचे आणि वज्रासारखे वागतील त्यांच्याशी वज्रासारखे वागावयाचे, ही आहे.

❑

लढाईसाठी ज्या वेळी देश तयारी करतो त्या वेळी मनगट लोखंडासारखे बळकट करावे लागते, त्याचप्रमाणे मनही लोखंडासारखे बळकट करावे लागते.

❑

शेजाऱ्याला वैरी करून नवा संसार मांडणारी शहाणी माणसे अजून मी या जगात पाहिलेली नाहीत.

❑

दुसऱ्या देशाच्या जीवनातील संकटाच्या राशी ह्या आक्रमकांच्या नेहमीच संधी असतात.

❑

सर्वनाशाची लढाई होण्याचा हिंदुस्थानमध्ये संभव निर्माण झाला, तर हिंदुस्थानला मदत करणारा जागतिक शांततेचा हिंदुस्थानचा जो सिद्धांत आहे, त्यासंबंधीची त्याची निष्ठा हेच त्याचे सगळ्यात मोठे हत्यार आहे, हे मी आपणाला सांगू इच्छितो. सगळ्या अणुबॉम्बना पचविणारी ही जी शक्ती आपल्या विचारांमध्ये आणि श्रद्धेमध्ये आहे तिचे आपण रक्षण केले पाहिजे.

❑

लढाईकरिता लढाई हा विचार मानवजातीच्या प्रगतीचे लक्षण आहे असे मी मानत नाही. प्रसंग पडला तर छाती पुढे काढून, मान ताठ ठेवून, प्राण जाईपर्यंत लढले पाहिजे आणि समोरून चालून येणाऱ्या शत्रूचा निःपात केला पाहिजे; परंतु समोर शत्रू नसेल तेव्हा आपली सर्व शक्ती, आपला सर्व निर्धार, जनसेवेचे व्रत हातात धरून, जेणेकरून जनतेचे कल्याण साधेल अशा प्रकारचे सामर्थ्य वाढविण्याच्या कामी आपण लावला पाहिजे.

❑

महाराष्ट्रात उद्योगीकरणाचा पुरस्कार मी मानतो, त्याप्रमाणे देशाच्या रक्षणार्थ लष्करीकरणाचा आग्रह मी धरतो. मला आयुबखान निर्माण करावयाचा आहे, मला आयुबखान व्हावयाचे आहे अशी

यावर टीका होते. पण भारतात आयुबखान निर्माण होऊ नयेत, म्हणून तर मी लष्करीकरणाचा पुरस्कार करीत असतो. बहुजनसमाजातून सैनिक व लष्करी अधिकारी येऊ लागले की, त्यांचा सामान्यांच्या जीवनाशी संबंध राहील व त्यामुळे लष्करात कधीच आयुबखान निर्माण होऊ शकणार नाही. सर्वांना लष्करी शिक्षण द्यावे असे माझे मत आहे.

❑

दान द्यावयाचे असेल, तर ते उत्कृष्ट गोष्टीचे द्यावे लागते. देशासाठी द्यावयाचे दानही असेच असले पाहिजे. नको असलेली गोष्ट दान देणे, याला दान म्हणत नाहीत.

❑

आमची बाणेदारपणाची, आत्मयज्ञाची, बलिदानाची परंपरा आहे. जे आक्रमक येथे आले त्यांना आमच्याशी समरस तरी व्हावे लागले, किंवा खुषीने येथून निघून तरी जावे लागले.

❑

निव्वळ पैशाने लढाई जिंकता आली असती तर शस्त्रांचे कारखाने काढण्याऐवजी आपण टांकसाळीच काढल्या असत्या.

❑ ❑

# सांस्कृतिक



राम आणि कृष्ण हे अवतारी पुरुष होते असे आपण मानतो. पण व्यासांनी आणि वाल्मिकींनी मनात आणले नसते, तर राम आणि कृष्ण हे महापुरुषसुद्धा आज कुठे असते परमेश्वरालाच माहीत! त्यांचे उत्तुंग जीवन शब्दबद्ध करण्यासाठी व्यासांची आणि वाल्मिकींची प्रतिभा फुलावी लागली.

❑

कुठलाही महाकवी किंवा कुठलाही कवी, निव्वळ शब्दांचा जुळारी होऊन कवी होऊ शकत नाही. नादमाधुर्य म्हणजेच काव्य असे आपणाला म्हणता येणार नाही. आपल्या मराठी वाङ्मयामध्येही असा एक काळ होता की, ज्या वेळी शब्दलालित्य म्हणजेच साहित्य असे समजून अशा साहित्यामागे लोक धाव घेत; परंतु निव्वळ नादमाधुर्यातूनच निर्माण होणाऱ्या काव्यात जनतेचे मन काबीज करण्याचे सामर्थ्य होऊ शकत नाही. त्या जुळणाऱ्या सुंदर नादमधुर शब्दांच्या पाठीमागे एक नवा सामर्थ्यवान संदेश देणारे मन आणि विचार असल्याशिवाय कवी किंवा महाकवी निर्माण होऊ शकत नाहीत.

❑

वर्तमानकाळ समजण्यासाठी इतिहासाचे सतत चिंतन करावे लागते. कारण वर्तमानकाळाशी झगडणाऱ्या माणसाला भूतकाळ समजण्याची जर अक्कल नसेल, तर वर्तमानकाळाशी तो फारसा झगडू शकणार नाही.

❑

भावनांना व्यक्तीच्या जीवनात जितके महत्त्व असते, तितके ते संस्थेच्या जीवनातही असते असे मात्र नाही. संस्थेच्या जीवनात भावनेपेक्षाही कार्यालाच अधिक महत्त्व असते.

❑

माझ्या मते भाषांतरी भाषा फारशी चांगली नसते. जमिनीतले पाणी, जमिनीतली सत्त्वे आणि जमिनीत इतर जी काही शक्ती असेल, ती घेऊन पिऊन जमिनीतून ऊस जसजसा वाढत जातो तशी भाषा ही जिंवत असली पाहिजे. मराठी भाषेने मराठी मनाचा कस घेऊनच वाढले पाहिजे. तरच खऱ्या अर्थाने मराठी भाषा वाढेल, अधिकाधिक उत्कर्ष पावेल.

❑

मी भाषेवर प्रेम करणारा मनुष्य आहे. पण मी भाषेचा संकुचित अर्थाने अभिमानी राहिलेलो नाही, हेही तितकेच खरे आहे. भाषा ही माणसांना एकत्र आणण्याचे साधन बनण्याऐवजी त्यांच्यात ती दुरावा निर्माण करील की काय, अशी आज आपल्याला भीती वाटू लागली आहे.

❑

गोड लाडू हातामध्ये दिला, तो सगळा लाडू गोड असतो आणि त्याचा लहानसा तुकडाही गोडच असतो. लाडवामध्ये जे गुणधर्म असतील ते त्याच्या लहानशा कणामध्येही असले पाहिजेत. साखरेचा लहानसा कण तोंडात टाकला तरी तो गोड लागतो आणि मूठभर साखर तोंडामध्ये टाकली तरी ती गोड लागते. त्याचप्रमाणे राष्ट्रामध्ये जे काही चांगले गुण असतील ते त्याच्या लहान स्वरूपात, म्हणजे त्यातल्या गावात, शहरातही दिसले पाहिजेत.

❑

या देशाने श्रीकृष्ण निर्माण केले आहेत, ज्ञानेश्वर निर्माण केले आहेत, सी. व्ही. रमण निर्माण केले आहेत आणि नारळीकर निर्माण केले आहेत. फार प्राचीन काळापासून ते अगदी आजपर्यंत आमच्यामध्ये हे सामर्थ्य आहे. याचा पडताळा आम्हांस अनेक वेळा आलेला आहे. परंतु या सामर्थ्याचा आम्ही उपयोग केलेला नाही. रंगभूमी हाही आपल्या जीवनाचाच एक भाग आहे. आपले जीवन, आपला समाज जसजसा बदलत जाईल त्याप्रमाणे रंगभूमीही बदलत जाणे अपरिहार्य आहे. आता रंगभूमीवर साडी नेसून पुरुष कधीही येऊ शकणार नाहीत. तेव्हा साडी नेसलेला बालगंधर्वांसारखा नट पुन्हा रंगभूमीवर दिसणार नाही, म्हणून उगाच हळहळण्यात काय अर्थ आहे?

❑

ज्ञानभाषा आणि लोकभाषा एक झाल्याशिवाय समाजाचे जीवन समर्थ होत नाही, उन्नत होत नाही, विकसित होत नाही. ज्ञानभाषा एक आणि लोकभाषा दुसरी, अशी हिंदुस्थानच्या जीवनाची परंपरागत कहाणी आहे. ऋषीमुनींची आणि पंडितांची ज्ञानभाषा होती संस्कृत. कारण ती देवभाषा होती आणि जनसामान्यांची भाषा होती प्राकृत. हे फार पूर्वी; पण नंतरही तेच झाले. मुसलमानी अमलात ज्ञानभाषा उर्दू, फारसी, अरबी जी काही असेल ती झाली. त्यानंतर इंग्रज आले आणि या देशातील ज्ञानभाषा इंग्रजी बनली. लोकभाषा अशा तऱ्हेने दुर्लक्षित राहिल्यावर लोक शहाणे होणार तरी कसे? आता स्वातंत्र्यानंतर जेव्हा जनजीवन आम्हाला विकसित करावयाचे आहे असे आम्ही म्हणतो, तेव्हाही लोकभाषा ज्ञानभाषा होणार नसेल, तर ज्ञानभाषा हा ज्यांचा मक्ता होता त्यांचेच संस्कार आणि त्यांचेच साम्राज्य सांस्कृतिक जीवनामध्ये निर्माण होईल.

❑

देशातील लेखक, देशातील विचारवंत, देशातील कलावंत, शास्त्रज्ञ आणि संशोधक यांच्या प्रयत्नाने निर्माण होणारे जे विचारधन आहे, ते खरे म्हणजे समाजाचे फार मोठे धन आहे असे मी मानतो. ते असले म्हणजे देश ओळखला जातो; समाजाचे जीवन प्रवाही राहते. समाज जिवंत राहतो तो त्याच्याजवळ असणाऱ्या भौतिक सामर्थ्याने नाही, तर त्याच्याजवळ असणाऱ्या सांस्कृतिक मूल्यांवर व विचारधनांवर!

❑

आपल्याला कदाचित कल्पना असेल की, कामाची व्याप्ती जितकी जास्त तितकी त्याची खोली कमी असते. निसर्गाचाच हा नियम आहे.

❑

वृत्तपत्रांनी सदासर्वकाळ सरकारची स्तुती करावी असे नव्हे. संसदीय लोकशाहीत वृत्तपत्रस्वातंत्र्य पवित्र मानले जाते आणि डोळ्यांत तेल घालून त्याचे रक्षण करण्यात येते. यामुळे सार्वजनिक महत्त्वाच्या व हिताच्या सर्व प्रश्नांवर स्पष्ट व मुक्तपणे चर्चा होऊ शकते.

❑

कधी साहित्यिक राजकारण्यांना मार्गदर्शन करतात, तर कधी राजकारणी साहित्यिकांना मार्गदर्शन करतात, असे हे सर्वत्र चालत आलेले आहे. तेव्हा माझ्या दृष्टीने मला जो महत्त्वाचा विचार आपल्याला सांगावयाचा आहे तो हा की, एक अनुभूती आणि एक विचार राबविण्याचे हे जे काम आहे ते अविभाज्य आहे.

❑

जीवनाच्या निरनिराळ्या क्षेत्रांशी अधिक निकटचे संबंध प्रस्थापित केल्याशिवाय आणि जीवनामध्ये असलेले श्लेष आणि काव्य यांच्याशी अधिक जवळीक केल्याशिवाय साहित्यात फारशी भर कोणी घालू शकेल, असे मला वाटत नाही.

❑

समाजातील विविध गटांतील लोकांचे प्रश्न वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून समजावून घेऊन सोडविण्याचे व्रत राज्याने घ्यावे. सामाजिक उदारता अंगी बाणल्याखेरीज हे व्रत पार पडणार नाही. पूजा गुणांची, जातीची नव्हे असे मी म्हणतो ते याचकरता!

❑

आपले हे महाराष्ट्र राज्य विविधतेने नटलेले आहे. ही विविधता निसर्गाच्या रचनेत जशी आहे, तशी माणसांतसुद्धा आहे. उत्तरेस सातपुडा आणि पश्चिमेस सह्याद्री यांची उत्तुंग शिखरे व त्यांच्या उतरणीतील घनदाट जंगले यांनी या भागास भव्योदात्त सौंदर्य प्राप्त झाले आहे, तर वर्धावैनगंगेच्या खोऱ्यात जागोजाग असलेली जलाशये व पळसाच्या लाल फुलांनी डवरलेली राने मनाला प्रसन्नता आणतात. कोकणचा किनारा अथांग पश्चिम सागराचे दर्शन घडवितो, तर गोदेच्या पाण्याने पुनीत व समृद्ध झालेली मराठवाड्याची भूमी महाराष्ट्राच्या तेजस्वी भूतकाळाची व संस्कृतीची आठवण करून देते. नागपूरच्या परिसरात भारतातच केवळ नव्हे, तर सर्व आशियात उत्तम म्हणून नावाजलेली संत्री पिकतात, तर रत्नागिरीकडे भारतात ज्याच्या तोडीचा दुसरा आंबा नाही तो हापूस आंबा अमाप पिकतो. विदर्भ-मराठवाड्याच्या काळ्याभोर जमिनीत कापूस भरघोस फुलतो, तर नगर-सोलापूर-कोल्हापूर भागात पिकणारा रसदार ऊस सर्वांचे तोंड गोड करतो. निरनिराळ्या भागांतील लोकांच्या बाबतीतही ही विविधता आहे. कोकणपट्टीतील माणसाचे अनुनासिक उच्चार ऐकून देशावरच्या माणसाला मौज वाटते, तर खानदेश-वऱ्हाडचा माणूस एक विशिष्ट हेल काढून बोलू लागला की, सांगली-कोल्हापूरकडील माणसांच्या चेहऱ्यावर स्मिताची रेषा न झळकली तरच आश्चर्य; पण या विविधतेतच महाराष्ट्रातील जीवनाचे सौंदर्य साठवलेले आहे. अशी विविधता नसेल, तर जीवन नीरस व रंगहीन होईल.

❑

आम्ही आमच्यामध्ये नाना तऱ्हेच्या सामाजिक भेदाभेदांची मोठी थोरली उतरंड रचली म्हणून हिंदुस्थान दुबळा झाला. हिंदुस्थानचा दुबळेपणा, हिंदुस्थानचा मागासलेपणा हा या उतरंडीचा परिणाम आहे, असे माझे स्पष्ट मत आहे. आम्ही खूप खटपट करतो आहोत आर्थिक क्रांती करावयाची, औद्योगिक क्रांती करावयाची. हातात आलेल्या मोठ्या थोरल्या स्वातंत्र्याच्या शक्तीचा, लोकशाहीच्या सत्तेचा वापर करावयाचा प्रयत्न चालला आहे. पण गाडा अजूनही काही फार पुढे जात नाही. याचे कारण समाजातील ही उतरंड आहे. उतरंड हा शब्द मी मुद्दामच वापरीत आहे. कारण आम्ही सर्व एकमेकांच्या डोक्यावर बसलो आहोत आणि वरचा जो खालच्याच्या डोक्यावर बसला आहे, तो नुसता बसलेला नाही तर तो त्याचा गळा धरून बसला आहे, त्याचे तोंड बंद करून बसला आहे. खालच्याला काही वावच नाही. समाजामध्ये आम्ही ही जी उच्च-नीचतेची, जातिभेदांची, वर्णभेदांची उतरंड रचलेली आहे, ती केवळ एकाच प्रांतात रचलेली नसून सर्व हिंदुस्थानभर रचलेली आहे. ही उतरंड मोडण्याचे काम ज्या दिवशी आपण करू, त्या दिवशी आपण खरी क्रांती केली असे मी म्हणेन.

❑

पंढरीच्या वारकऱ्याला जागा करून चंद्रभागेच्या वाळवंटावर जातभेद काही नाही, असेच जणू घोषित करीत भागवत धर्माचा झेंडा उभा राहिला. माझ्या कल्पनेने तो सुधारणेचा झेंडा होता. आजही मी पंढरपूरच्या मंदिरात जातो तेव्हा याच भावनेने जातो. चंद्रभागेच्या वाळवंटावर महाराष्ट्रातल्या खेड्यापाड्यांतला ब्राह्मण, मराठा, माळी, न्हावी, भंगी, कुंभार, सुतार, महार– मी हे वेगवेगळे जातिवाचक शब्द वापरतो त्यांचा उल्लेख केला पाहिजे म्हणून वापरतो, मला त्याची काही हौस नाही– हे सगळे तेथे एका मेळ्यामध्ये आले आणि त्यांनी पंढरीचा झेंडा, भागवत धर्माचा झेंडा उभा केला. त्यामध्ये जसे तुकाराम झाले, नामदेव झाले, रामदास झाले, ज्ञानेश्वर झाले, तसेच चोखा मेळा, गोरा कुंभार आणि सावता माळी हेही झाले. खरे म्हणजे सामाजिक क्रांतीच व्हावयास पाहिजे होती अशा वेळी; पण आजही आम्ही असे पाहतो की, सावता माळी फक्त माळ्यांचा संत आहे, नामदेव फक्त शिप्यांचा संत आहे, चोखा मेळा फक्त महारांचा संत आहे. गोरा कुंभार फक्त कुंभारांचा संत आहे. अशीच वाटणी का आम्ही नेहमी करणार आहोत? शिंपी समाजाला नाव देताना नामदेव शिंपी समाज असे म्हणतात. नामदेवांचे एवढे मोठे विश्वव्यापी काम! परंतु आज आम्ही काय त्यांना एका शिंपी समाजाचे प्रतीक मानणार? मी शिंपी समाजाला दोष देत नाही. पण आमची प्रवृत्ती कशी आहे पाहा. जोतिबा फुल्यांनी सामाजिक क्रांतीचा संदेश दिला. त्या संदेशातून डॉ. आंबेडकर यांच्यासारखी कर्तृत्ववान, धगधगती माणसे निर्माण झाली. एक मोठी शक्ती निर्माण झाली; पण महात्मा फुले फक्त माळ्यांचे, डॉ. आंबेडकर फक्त बौद्धांचे, गांधी फक्त गुजराथ्यांचे, टिळक फक्त ब्राह्मणांचे, शिवाजीमहाराज फक्त मराठ्यांचे अशा प्रकारे जर आम्ही या महापुरुषांच्या वाटण्या केल्या, तर या हिंदुस्थानमध्ये सामाजिक क्रांती कधीच होणार नाही. ❑

ब्राह्मण ब्राह्मणांपुरता विचार करतो. मराठा मराठ्यांपुरता विचार करतो, महार महारांपुरता विचार करतो, माळी माळ्यांपुरता विचार करतो. हे मासले मी केवळ नमुन्यादाखल सांगितले. जातीयवादाच्या या विषारी विचारापासून आपण महाराष्ट्राला मुक्त केले पाहिजे. जातीयवादाचा हा विचारच समूळ नष्ट केला पाहिजे, तेव्हाच महाराष्ट्राचे सामाजिक मन एकजिनसी होईल; परंतु हे कार्य आपण एका दिवसात, एका रात्रीत करू शकणार नाही. त्यासाठी विचारी माणसांनी विचारपूर्वक प्रयत्न केल्याशिवाय हे घडून येणार नाही.

❑

जो देश आपला इतिहास विसरतो, त्याला इतिहासाची पुनरावृत्ती करण्याची शिक्षा मिळते. आम्हांला आमच्या देशाच्या इतिहासाची पुनरावृत्ती करावयाची नाही. आम्हांला महापुरुष निर्माण करावयाचे आहेत. शेकडो वेळा दुसऱ्यांचे हल्ले पत्करून त्यांची आम्हांला आता गुलामी करावयाची नाही; ज्ञानाला बंदिखान्यात ठेवणारा आणि चित्तामध्ये भय निर्माण करणारा समाज यापुढे आम्हांला निर्माण करावयाचा नाही.

❑

महापुरुषांच्या निर्मितीला, त्यांच्या कार्याला, त्यांच्या पराक्रमाला काही सामाजिक कारणपरंपरा असावी लागते. त्यांच्या पाठीमागे हळूहळू समाजजीवनाची शक्ती निर्माण व्हावी लागते. शिवाजीमहाराज म्हणजे फक्त भवानीदेवीचा प्रसाद असे मानीत नाही. शिवाजीमहाराजांचे जीवन हे मराठी जनतेच्या जीवनाचा प्रसाद आहे, अशी माझी स्वत:ची भावना आहे.

❑

कुठल्याही समाजातील कर्तृत्त्ववान मनुष्य हा समाजाला सोडून कर्तृत्व करूच शकत नाही. नवनीत म्हणजे आपण ज्याला लोणी म्हणतो, ते दुधातून येते. दूध नसेल तर लोणी नाही. समाजजीवन जेव्हा खळखळलेले असते, तेव्हा त्यामध्ये काहीतरी साचत असते. नवनीत निर्मिणाऱ्या दुधाप्रमाणे त्यात एक शक्ती असते. नवनीताला स्वतंत्र अस्तित्त्व असते ही खोटी गोष्ट आहे. तीच गोष्ट कुठल्याही कर्तृत्त्ववान दिसणाऱ्या माणसाच्या जीवनासंबंधीही खरी आहे.

❑

महाराष्ट्रातील बहुसंख्य वस्ती खेड्यात आहे आणि त्यात मराठा समाज बहुसंख्येने जास्त असल्याने महार-चांभार-ब्राह्मण-सुतार-माळी इत्यादी अल्पसंख्य लोकांचे रक्षण करण्याची जबाबदारी मराठ्यांवर आहे.

❑

'मराठा' हा जातिवाचक नाही. आचार्य अत्र्यांनी आपल्या वर्तमानपत्राला 'मराठा' हे नाव दिले, तर काय तो शब्द जातीयवाचक आहे म्हणून दिले? 'मराठा' शब्दामागे महाराष्ट्राच्या एकजिनसी जीवनाची भावना आहे. 'मराठा' शब्दाचा हाच अर्थ आम्हांला अभिप्रेत आहे आणि म्हणून मराठी राज्य हे कोणा एका जमातीचे राज्य मुळीच होता कामा नये, या गोष्टीवर माझा जरूर विश्वास आहे.

❑

मॉन्ट्रीयल येथील मॅग्गील विद्यापीठातील इस्लामी संस्कृतीच्या अध्ययनशाखेचे प्रमुख प्रा. विलफ्रेड कॅन्टवेल स्मिथ यांनी मुसलमानांच्या संबंधी खालीलप्रमाणे उद्गार काढले आहेत : "भारतातील मुसलमानांचे भवितव्य हे जगातील इतर मुसलमानांच्या किंबहुना सर्वच जनसमूहाच्या भवितव्याप्रमाणे, त्यांच्या आत्मिक बलावर, श्रद्धेवर व सर्जनशीलतेवर आणि अन्य बांधवांबरोबरच्या त्यांच्या संबंधावर अवलंबून आहे." परिस्थितीशी त्यांनी जुळवून घेतले, तर कोणतीही गोष्ट त्यांना असाध्य नाही. वास्तविक पाहता त्यांची भूमिका पुढाकाराची राहणार असून ही भूमिका ते योग्य प्रकारे पार पाडू शकले, तर ते आपल्या देशाची यथोचित सेवा करतील, एवढेच नव्हे तर झपाट्याने बदलत असलेल्या सध्याच्या जगात इस्लामच्या धर्माचीही त्यांच्याकडून सेवा घडेल.

❑

धर्मनिरपेक्षतेच्या विचाराचा खरा निश्चित अर्थ काय? या विचाराचे दोन भाग आहेत. या विचाराचा पहिला जो अर्थ आहे तो म्हणजे निधर्मता, धर्मनिरपेक्षता. परंतु त्यासाठी विनोबाजींनी जो शब्द वापरला आहे तो फार चांगला आहे. तो शब्द म्हणजे सर्वधर्मसमभाव. मी हिंदू आहे, मला हिंदुधर्म प्रिय आहे. पण मला हिंदुधर्म प्रिय असला तरी मुसलमानी धर्मासंबंधी, ख्रिस्ती धर्मासंबंधी माझ्या मनात विरोधी भाव नसला पाहिजे. ही एक पहिली, एक मानसिक भावना झाली. पण या विचाराचा अर्थ निव्वळ धर्मनिरपेक्षता असा नाही. त्याचा दुसराही एक महत्त्वाचा भाग आहे आणि तो भाग असा आहे की, मी जेव्हा राजकारण करीन, तेव्हा माझ्या राजकारणामध्ये मी धर्माला प्राधान्य देणार नाही; तेथे धर्माला स्थान नाही. राजकारणामध्ये जेव्हा धर्माला प्राधान्य येते, तेव्हा ते राजकारण जातीयवादी बनते. पण जातीयवादी राजकारण म्हणजे काय? जेव्हा तुम्ही राजकारणाचा विचार करता; आणि मी हिंदू आहे व हिंदुत्वाचा मला विचार केला पाहिजे, माझ्या हिंदुत्वाला जास्त प्रतिष्ठा प्राप्त झाली पाहिजे, किंवा माझ्या इस्लामला जास्त प्रतिष्ठा मिळाली पाहिजे असा ज्या वेळी तुम्ही मनात विचार आणता, त्यावेळी राजकारण जातीयवादी बनते. या जातीयवादी राजकारणाचा दुसराही एक महत्त्वाचा भाग आहे. जे लहान लहान अल्पसंख्य आहेत त्यांच्या मनामध्ये संशय निर्माण झाला, शंका निर्माण झाली, तर ती समजण्यासारखी आहे. परंतु जो बहुसंख्य समाज आहे तोच जर जातीयवादी झाला, तर राष्ट्र संपले म्हणून समजावे.

❑

शिक्षणाने देशात बेकारीच निर्माण होणार असेल, तर देशामध्ये सुशिक्षित बेकार असणे अधिक चांगले असे मी म्हणेन. कारण सुशिक्षित बेकार निदान विचार तरी करू शकेल. आपण बेकार का राहिलो याची तो कारणपरंपरा शोधील आणि ती दूर करण्याचा तो प्रयत्न करील. तेव्हा शिक्षणाने सुशिक्षित बेकारांचा धोका निर्माण होईल या शंकेत काही अर्थ नाही.

❑

शिक्षणाने एक प्रकारचे मानसिक व बौद्धिक सामर्थ्य निर्माण झाले पाहिजे. एवढेच नव्हे, तर या बौद्धिक व मानसिक सामर्थ्याच्या जोरावर आपल्या जीवनाचा यशस्वी मार्ग आपण शोधून काढीत असताना, ज्या समाजाने आपल्या कल्याणासाठी या ज्ञानगंगा उघडल्या, त्या समाजाचेही थोडेफार ऋण फेडण्याची शक्ती व भावना या शिक्षणाने आपल्या मनात निर्माण झाली पाहिजे.

❑

शिक्षण व शास्त्रीय दृष्टिकोनाचा अभाव यामुळे आपल्याला जीवनाच्या सर्व क्षेत्रांत माघार घ्यावी लागते. याउलट शास्त्रीय वैज्ञानिक ज्ञानाने युक्त अशी राष्ट्रे स्वत:चे सार्वभौमत्व अखंड ठेवू शकतात. इतकेच नव्हे, तर दुसऱ्यांच्याही मदतीला धावून जाऊ शकतात.

❑

असत्यापासून सत्याकडे, अंधारातून प्रकाशाकडे, मृत्यूपासून अमृताकडे मला ने. या अमृतत्त्वाच्या प्राप्तीसाठी देवांनी समुद्रमंथन केले; पण त्या समुद्रमंथनातून जे अमृत निघाले ते देव प्राशन करून बसले. आता आमच्यासाठी अमृत शिल्लकच राहिलेले नाही, म्हणून आता ज्ञान हेच अमृत आहे. या अमृताने तुम्हाला समर्थ बनावयाचे आहे, समाजजीवन समर्थ बनवायचे आहे.

❑

वयच केवळ नव्हे, तर आपल्यापुढील आव्हान स्वीकारून त्याला तोंड देण्याची कुवत हे पण मी तारुण्याचे गमक मानतो. खरे म्हणज माणूस तरुण आहे की वृद्ध आहे याची कसोटी त्यावरच ठरते. लोकमान्य टिळक प्रीव्ही कौन्सिलात आपला खटला हरल्यानंतर, "या पराभवानं तुमचं मनोधैर्य खचलं का?" असे त्यांना कोणीसे विचारले. त्यावर टिळकांनी उत्तर दिले, "माझं धैर्य कदापि खचणार नाही. मी ज्या पिढीत वाढलो, त्या पिढीवर आकाश जरी कोसळलं, तरी त्या कोसळलेल्या आकाशावर पाय रोवून ती उभी राहील आणि लढत देईल." टिळकांचे हे तेजस्वी उद्‌गार आमच्या तरुणांचे ब्रीदवाक्य झाले पाहिजे.

❑

आपण ज्ञानीही व्हा व शहाणेही व्हा. ज्ञानात आणि शहाणपणात फरक आहे असे सुचविलेले आहे. शास्त्रांचे ज्ञान तत्त्वाच्या दृष्टीने करून घेणे अत्यंत आवश्यक असते. परंतु त्या ज्ञानाचा समाजजीवनात उपयोग करून घेण्याचे जे शास्त्र आहे, त्याचे नाव शहाणपण असे मी समजतो. विद्यापीठातून बाहेर पडल्यानंतर ज्ञानाबरोबरच हे शहाणपण मिळवावे लागणार आहे. कारण या शहाणपणाची देशाला आज फार गरज आहे.

❑

शिक्षण संपल्यानंतर नोकरी करणार नाही अशी प्रतिज्ञा करा. बुद्धी व हात यांचा उपयोग करा. शौर्याला आम्ही कमी पडलो नाही तर शास्त्राला कमी पडलो. नव्या आकांक्षांनी पेटलेले तरुण आता पुढे आले पाहिजेत. कर्तृत्त्वाचे पीकच महाराष्ट्रात उभे राहिले पाहिजे. गुणी व बुद्धिमान असा महाराष्ट्र उभा राहिला पाहिजे. नवीन घडणारा महाराष्ट्र 'Sky is the limit' असा आदर्श ठेवणारा होवो.

❑ ❑

16116
14/11/05

यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालय
जनरल जगन्नाथ/भोसले मार्ग,
मुंबई - ४०० ०२१.
दूरध्वनी : २०२ ८५९८ / २८५ २०८१

यशवंतराव चव्हाण

१, रेस कोर्स रोड,
नवी दिल्ली ११००११

३ सप्टेंबर १९८४

[illegible],

[illegible]

[illegible]